पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९८ ■ शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com




## टी-२० इतिहासात भारताचा नवा विक्रम!

वृत्तसंस्था २४ जानेवारी

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाने रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर न्यूझीलंडविरुद्ध दुसऱ्या टी-२० सामन्यात इतिहास रचला. २०९ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने केवळ १५.२ षटकांत ३ गडी गमावत हा सामना जिंकला आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (पूर्ण सदस्य राष्ट्रांमध्ये) २०० पेक्षा जास्त धावांचे लक्ष्य सर्वात कमी चेंडूंमध्ये गाठण्याचा नवा जागतिक विक्रम आपल्या नावावर केला.या विजयासह भारताने २८ चेंडू शिल्लक ठेवत सामना जिंकला. त्यामुळे पाकिस्तानने २०२५ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच केलेला २४ चेंडू शिल्लक ठेवून विजयाचा विक्रम मोडीत निघाला. पाच सामन्यांच्या मालिकेत भारताने या विजयासह २-० अशी भक्कम आघाडी घेतली आहे. या ऐतिहासिक विजयाचा प्रमुख शिल्पकार ठरला ईशान किशन. जवळपास दोन वर्षे तीन महिने संघाबाहेर राहिल्यानंतर दमदार पुनरागमन करत किशनने पॉवरप्लेमध्येच आक्रमक फलंदाजीचा नमुना सादर केला.

## मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीत सत्ताधारी-विरोधकांचे संख्याबळ समसमान

प्रतिनिधी २४ जानेवारी

**मुंबई :** महानगरपालिकेचा निकाल जाहीर झाल्यानंतर विविध पक्षांचे संख्याबळ स्पष्ट झाले असून, त्या आधारे महापालिकेतील समित्यांमध्ये प्रतिनिधित्व निश्चित होत आहे. मात्र सर्वाधिक महत्त्वाची मानली जाणारी स्थायी समिती यंदा विशेष चर्चेत आली आहे. कारण या समितीवर सत्ताधारी आणि विरोधी पक्षांचे संख्याबळ समसमान झाले आहे. स्थायी समितीवर सत्ताधारी बाजूने भारतीय जनता पार्टीचे १० आणि शिवसेना शिंदे गटाचे ३ सदस्य आहेत. या दोन्ही पक्षांची युती असल्याने सत्ताधारी गटाचे एकूण संख्याबळ १३ झाले आहे. दुसरीकडे विरोधी बाकांवर शिवसेना ठाकरे गटाचे ८, काँग्रेसचे ३, मनसेचे १ आणि एमआयएमचा १ सदस्य आहे. त्यामुळे विरोधकांचेही एकूण संख्याबळ १३ इतकेच आहे. या समसमान स्थितीमुळे स्थायी समितीत कोणताही निर्णय पारित करणे सत्ताधाऱ्यांसाठी सोपे राहणार नाही. अर्थसंकल्पीय मंजुरी, मोठे प्रस्ताव, धोरणात्मक निर्णय अशा प्रत्येक टप्प्यावर विरोधकांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

## लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

प्रतिनिधी २४ जानेवारी

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी राज्य सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. योजनेबाबतच्या तक्रारी आणि शंकांचे निरसन करण्यासाठी आता महिलांना कोठेही हेलपाटे मारण्याची गरज उरणार नाही. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी यासंदर्भात '१८१' हा हेल्पलाईन क्रमांक जाहीर केला आहे. e-KYC प्रक्रियेत झालेली चूक किंवा तांत्रिक अडचणींमुळे लाभ थांबला असल्यास, लाभार्थी महिला १८१ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. हेल्पलाईनवर येणाऱ्या फोन कॉल्सना उत्तर देण्यासाठी आणि समस्या सोडवण्यासाठी कॉल ऑपरेटर्सना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. ज्या महिलांनी e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडला आहे, त्यांची आता अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष घरी जाऊन पडताळणी केली जाणार आहे.

# नाव शहर सुधार आघाडीचे 'सत्ता' भाजपची!

## काँग्रेस आमदार साजीद खान यांना मोठा धक्का

प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला :** सिटी न्यूज सुपरफास्ट ने १९ जानेवारी च्या अंकात कमळाला तुतारीची साथ या मथळ्याची बातमी प्रसिध्द केली होती. त्या बातमीमधील प्रत्येक शब्द खरा ठरला आहे. अकोला महापालिकेत सत्ता स्थापनेच्या सुरू असलेल्या हालचालीला अखेर काल संध्याकाळी पूर्णविराम मिळाला. भाजपाने नेहमीप्रमाणे धक्कातंत्राचा वापर करीत आपले पत्ते खुले केल्याने सर्वांनाच आश्चर्य वाटले. भाजप आमदार रणधीर सावरकर यांनी 'आमच्याकडे बहुमत असून भाजप व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार आहे,' असा दावा माध्यमांशी बोलताना केला. त्यानंतर काही वेळातच 'शहर सुधार आघाडी' स्थापन झाल्याचे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले. या आघाडीमुळे अनेक दिग्गजांच्या स्वप्नांना सुरूंग लागला असून, इतर पक्षांनी जो मोट बांधण्याचा प्रयत्न केला होता त्यात 'शहर सुधार आघाडी'मुळे बिघाडी आली आहे. तूर्त सर्वच चर्चांना ब्रेक लागला आहे. काँग्रेस नेते साजीद खान यांना मोठा फटका बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

सत्ता स्थापनेचे चित्र बदलण्याची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, भाजपने गेम फिरवत मित्र पक्षांना सोबत घेत 'शहर सुधार आघाडी' स्थापन करून सत्ता आपल्याकडेच राहील, अशी खेळी केली आहे. अकोला महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे गणित जुळले असून भाजप व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. भाजपच्या नेतृत्वाखाली 'शहर सुधार आघाडी' स्थापन करण्यात आली असून गट स्थापनेसंदर्भातील पत्र अमरावती विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आले आहे. या पत्रात भाजप, शरद पवार गट, अजित पवार गट, शिंदे गट व अपक्ष नगरसेवकांचा समावेश असल्याचे नमूद आहे. शहर सुधार आघाडीचे गटनेते म्हणून पवन महल्ले यांची स्वाक्षरी या पत्रावर आहे. भाजप-मित्रपक्षांची सत्ता स्थापन झाल्यानंतर महापौरपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडते, याकडे आता शहराचे लक्ष लागले आहे.

### विरोधकांच्या प्रयत्नांवर फिरले पाणी!

शुक्रवारी दिवसभर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, काँग्रेस आमदार साजिद खान पठाण तसेच ठाकरेंचे आमदार नितीन देशमुख यांच्याकडून सत्तास्थापनेसाठी प्रयत्न सुरू होते. मात्र, संध्याकाळी भाजप आमदार रणधीर सावरकर यांनी 'आमच्याकडे बहुमत असून भाजप व मित्रपक्षांची सत्ता स्थापन होणार आहे,' असा दावा केल्याने सर्वांच्या प्रयत्नांवर पाणी फिरले असून, त्यांचे मनसुबे हवेतच विरले आहेत.

### लवकरच सत्ता स्थापनेचा दावा....

शहर सुधार आघाडी ही शहराच्या सर्वांगिण विकासासाठी आम्ही स्थापन केली आहे. तीन हजार कोटींचे कामे शहरात सुरु आहे. भविष्यात विकसित शहर, समस्या मुक्त शहर हे आमचे लक्ष असून त्या दृष्टीने पावले उचलण्यात येतील. अकोला शहराचा विकास हेच ध्येय आहे. राज्य आणि केंद्रातील सत्ता याची आम्हाला मोठी मदत होईल.

**विजय अग्रवाल ,**
महापालिका निवडणुक प्रभारी




**19 जानेवारीचे सिटीन्यूज सुपरफास्टचे भाकित 100 टक्के खरे....**

**30 जानेवारीचा मुहूर्त ठरला!**

### भाजपाचे संख्याबळ पोहोचले ४४ वर!

महापालिकेतील एकूण संख्याबळ पाहता भाजपकडे ३८ नगरसेवक आहेत. त्यांना शिंदे गट (१), अजित पवार गट (१), शरद पवार गट (३) व विकास आघाडी (१) यांचे पाठबळ मिळाल्याने एकूण संख्याबळ ४४ वर पोहोचले असून स्पष्ट बहुमत पूर्ण झाले आहे.

### शर्यतीत भाजप नगरसेविका

नीतू जगताप, प्राची काकड, माधुरी क्षीरसागर, योगिता पावसाळे, वैशाली शेळके, मंजूषा शेळके, पल्लवी मोरे, शिल्पा वरोकार, रश्मी अवचार, निकिता देशमुख, सोनाली अंधारे, शारदा खेडकर, कल्पना गोटफोडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पूजा गावंडे यांचा समावेश आहे.

## मुंबईचा भाजपने फिरवला गेम!

प्रतिनिधी २४ जानेवारी

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागला आहे. त्यानंतर गेल्या काही दिवसापासून महापौर पदावरून महायुतीधील भाजप व एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत जोरदार रस्सीखेच सुरु आहे. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे.

एकीकडे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्ष सुरु असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरुवातीचे अडीच वर्ष महापौर पदावर दावा केला आहे. दुसरीकडे मात्र, भाजपने दिल्लीचा 'फायनल' कॉल येताच शिंदेंच्या अडीच वर्षांच्या हट्टावर गेम फिरवला आहे. त्यामुळे आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला उपमहापौर पदावर समाधान मानावे लागणार असे दिसत आहे. त्यासाठी शिंदे सेनेतील काही नावाची चर्चा जोरात सुरु आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीचा निकाल लागला आहे. सत्ता स्थापनेसाठी ११४ जागांचा आकडा गाठण्याची गरज आहे. भाजप आणि शिंदेसेनेचा एकत्रित आकडा ११८ इतका आहे. १९९७ ते २०२२ अशी २५ वर्षे मुंबई महापालिकेत शिवसेनेचा महापौर होता. एकसंध शिवसेना आणि भाजपची युती असताना सेनेकडे महापौरपद आणि भाजपकडे उपमहापौरपद अशी सत्तापदांची वाटणी व्हायची. मात्र, आता पहिल्यांदाच नेमकी उलट परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे महापौर आणि उपमहापौरपदाचं गणित पहिल्यांदाच बदलणार आहे.

एकनाथ शिंदे सेनेने महापौरपद अडीच वर्षांसाठी मिळावे, असा आग्रह शिंदेसेनेनं धरला. पण यासंदर्भात कोणतीही तडजोड न करण्याची भूमिका भाजपने घेतली आहे. यंदा भाजपनं शिवसेनेपेक्षा तिप्पट जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे शिवसेनेला पहिल्यांदाच उपमहापौरपदावर समाधान मानावं लागेल. महापौरपद आपल्याकडे ठेवण्यावर भाजप अतिशय ठाम आहे. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाला आजपासून सुरुवात झाली आहे. त्यामुळे या कालावधीत महापौरपद आपल्याकडे असावं, अशी शिवसेनेची इच्छा होती. त्यांनी यासंदर्भात मागणी करुन पाहिली. पण भाजपनं ही मागणी अमान्य केली आहे. उपमहापौरपदासाठी आता एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून समृद्धी काते, शैला लांडे, अश्विनी माटेकर यांची नावे चर्चेत आहेत. तृष्णा विश्वासराव, संध्या दोषी, अंजली नाईक यांच्या नावांचा विचार स्थायी समिती, शिक्षण समितीसाठी केला जाण्याची शक्यता आहे.

## प्रजासत्ताक दिनापूर्वी मोठा दहशतवादी कट उधळला!

वृत्तसंस्था २४ जानेवारी

**चंदिगड :** प्रजासत्ताक दिनापूर्वी पंजाब पोलिसांनी एक मोठा दहशतवादी कट उधळला आहे. होशियारपूरमध्ये पोलिसांनी पाकिस्तानच्या 'आयएसआय' समर्थित प्रतिबंधित संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार दहशतवाद्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून सुमारे २.५ किलो आरडीएक्सने भरलेले आयईडी जप्त करण्यात आले आहे.

पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांची दिलजोत सिंह, हरमन सिंह उर्फ हॅरी, अजय उर्फ माहिरा आणि अर्शदीप सिंह उर्फ अर्श कंडोला अशी नावं आहेत. हे सर्वजण एसबीएस नगर जिल्ह्यातील राहों भागातील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून स्फोटकांव्यतिरिक्त दोन पिस्तूलही जप्त केली आहेत. डीजीपी गौरव यादव यांच्या माहितीनुसार, हे मॉड्यूल अमेरिकेत बसलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या हँडलर्सद्वारे चालवलं जात होतं. प्राथमिक तपासात असं समोर आलं आहे की, प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांना लक्ष्य करून मोठा दहशतवादी हल्ला करण्यासाठी या आयईडीचा वापर केला जाणार होता.

### अमेरिकेतून मिळत होते निर्देश

बीकेआयचे हँडलर अमेरिकेत बसून या दहशतवाद्यांना सूचना देत होते, तर पाकिस्तानची गुप्तचर संघटना 'आयएसआय' त्यांना स्फोटके पुरवत होती. पंजाबमधील शांतता भंग करणं आणि 'टार्गेटेड किलिंग' करण्यासाठी ही टोळी तयार करण्यात आली होती. पोलीस सध्या या चारही दहशतवाद्यांची कसून चौकशी करत असून त्यांच्या इतर साथीदारांचा शोध घेतला जात आहे. होशियारपूरचे वरिष्ठ पोलीस अधीक्षक संदीप मलिक यांनी सांगितलं की, गुप्तचर माहितीच्या आधारे होशियारपूर पोलीस आणि सीआय जालंधरच्या पथकांनी ही संयुक्त कारवाई केली आहे.

## जगातील प्रमुख देशांनी ट्रम्प यांच्या नाड्या आवळल्या!

### टॅरिफच्या मुद्यावर 'ब्रह्मास्त्रा'ने जबर हादरा

वृत्तसंस्था २४ जानेवारी

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कधी काय करतील सांगता येत नाही. अगदी काही दिवसांपूर्वी त्यांनी ग्रीनलँडला आपल्यात विलीन करण्याबद्दल बोलून जगभरात खळबळ उडवून दिली होती.

युरोपीय देशांनीही यावर प्रतिक्रिया दिली, ज्यामुळे अमेरिका आणि युरोपमध्ये संभाव्य संघर्ष निर्माण झाला होता. अमेरिकेच्या ग्रीनलँड काबीज करण्याच्या योजनेला विरोध करणाऱ्या कोणत्याही देशावर प्रत्युत्तरात्मक कर लादण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली होती, पण दोन दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी भूमिका बदलली.

कालपर्यंत आक्रमक असलेल्या ट्रम्प यांनी अचानक आपला सूर बदलला आणि दावोस परिषदेत ट्रम्प यांनी ग्रीनलँड ताब्यात घेण्यासाठी बळाचा वापर करणार नाही तसेच, युरोपीय देशांवर १०इ देखील कर लादणार असल्याचे स्पष्ट केले. अशा परिस्थितीत, आता रातोरात नेमकं काय बदललं, असा सवाल उपस्थित होत आहे. युरोपचा व्यापारी गोंधळ, ज्याच्या धोक्यामुळे अमेरिकेला पुनर्विचार करण्यास भाग पाडले गेले असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. 'ट्रेड बझूका' ईयूच्या अँटी-कोअरशन इन्स्ट्रुमेंट (ACI) चे संक्षिप्त रूप आहे, ज्याला EU चे व्यापार शस्त्र म्हणून देखील ओळखले जाते. यामध्ये ईयू सदस्य देश किंवा कंपन्यांवर अनावश्यक दबाव आणणाऱ्या देशांकडून व्यापार आणि गुंतवणूक रोखण्यासाठी किंवा मर्यादित करण्यासाठी अनेक उपाययोजनांचा समावेश असून या उपाययोजनांमध्ये वस्तू आणि सेवांची निर्यात आणि आयात कमी करणे, देशांना किंवा कंपन्यांना EU सरकारच्या बोलींमध्ये सहभागी होण्यापासून रोखणे किंवा परदेशी गुंतवणूक प्रतिबंधित करणे समाविष्ट असू शकते. सर्वात गंभीर परिस्थितीत, हा 'बझूका' ईयूच्या ४५० दशलक्ष-बलवान बाजारपेठेतील प्रवेश पूर्णपणे रोखू शकतो. ईयूच्या 'ब्रह्मास्त्रा'चा अमेरिकेवर काय परिणाम होणार

युरोपियन युनियनने त्यांचा 'ट्रेड बझूका' वापरला तर अमेरिकेला अडचणी येऊ शकतात. या बझूकामुळे अमेरिकन कंपन्या आणि अमेरिकन अर्थव्यवस्थेचे अब्जावधी डॉलर्सचे नुकसान होऊ शकते.

## दोन हजारांच्या नोटांनी भरलेले कंटेनर

प्रतिनिधी २४ जानेवारी

**नाशिक :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या धामधुमीत कर्नाटकातील चोरली घाट परिसरात तब्बल ४०० कोटी रुपयांच्या रोख रकमेचा कंटेनर चोरीला गेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या संशयातून नाशिकमधील संदीप पाटील या तरुणाचे अपहरण करून त्याला मारहाण व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी नाशिक ग्रामीण पोलिसांनी पाच संशयितांना अटक केली असून, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता विशेष तपास पथक (एघ्ऊ) स्थापन करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील रहिवासी संदीप पाटील यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, कर्नाटकातील चोरली घाटात ४०० कोटी रुपयांचा रोख रकमेचा कंटेनर चोरीला गेल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला.

## लिनेस क्लबचा 'कल्पवृक्ष' प्रांतीय पदग्रहण सोहळयाचे आयोजन

### लिनेस कल्पनाजी देशमुख स्वीकारणार प्रांताध्यक्षपदाची धुरा

प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला:** 'ऑल इंडिया लिनेस क्लब' च्या डिस्ट्रिक्ट एम एच फाईव्ह हिरकणी च्या वतीने वर्ष २०२६ या 'मल्टीपल चतुर्भुजा' वर्षाचा भव्य प्रांतीय पदग्रहण समारंभ 'कल्पवृक्ष' येत्या रविवारी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात नवनियुक्त प्रांताध्यक्षा म्हणून लिनेस कल्पनाजी देशमुख आपल्या पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत.

लिनेस च्या हा दिमाखदार सोहळा रविवार, २५ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजेपासून शुभकर्ता लॉन्स, रुक्मिणी नगर, अकोला येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन 'एआयएलसी' पेट्रन लि. इंदुजीजी मेहता यांच्या हस्ते होईल. तर, नवनियुक्त प्रांताध्यक्षांना शपथ देण्याचे काम 'एआयएलसी' च्या संस्थापक अध्यक्षा लिनेस डॉ. मंजिरीजी कुलकर्णी करणार आहेत. याप्रसंगी नवनियुक्त बहुप्रांताध्यक्षा लि. अलकाजी डोंगरे, पूर्व बहुप्रांताध्यक्षा लि. सुनिलाजी नरप्पनवार, लि. निर्मलाजी जैन आणि लि. कुमकुमजी वर्मा प्रांत सचिव लिनेस रिंकूजी खंडेलवाल, प्रांत कोषाध्यक्ष लिनेस शीतल अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. 'एक साथ, एक लक्ष्य... उज्वल समाज का निर्माण' हे ब्रीदवाक्य घेऊन यावर्षीच्या कार्यकाळाची सुरुवात होत आहे. या सोहळ्यासोबतच महत्त्वाच्या सत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. पी.एस.टी. सेमिनार हा दुपारी १२ ते २ या वेळेत होईल. त्याच बरोबर सचिव, कोषाध्यक्ष आणि कॅबिनेट सदस्यांचे प्रशिक्षण होईल. यावेळी प्रशिक्षक म्हणून लि. उषाजी बाहेती, लि. हरविंदरकौरजी सेठी, लि. डॉ. ताराजी माहेश्वरी, लि. डॉ. तेजलजी चौधरी आणि लि. आशाजी विरवाणी हे मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी, दुपारी ३ ते ४ या वेळेत पहिली कॅबिनेट मीटिंग पार पडेल. सोहळ्याचे आकर्षण वाढवण्यासाठी



विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यात तिल्लीचे व्यंजन बनवणे, देवाच्या पोशाखापासून तोरण तयार करणे आणि नारी शक्तीवर आधारित पतंग सजावट यांचा समावेश आहे.या कार्यक्रमाचे आयोजन लिनेस क्लब ऑफ अकोला च्या वतीने करण्यात आले असून, लिनेस साधनाजी पळसकर, प्रांतिय सचिव लिनेस सुवर्णाजी महाजन, लिनेस क्लब अकोलाच्या अध्यक्षा लिनेस राजेश्रीजी समनपुरे, लिनेस अलकाजी उमाळे आणि वनिताजी बिजवे यांनी सर्व लिनेस बहिणींनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## ४८ तास धोक्याचे! चक्रीवादळासह अवकाळी पावसाचा इशारा

प्रतिनिधी २४ जानेवारी

**मुंबई:** भारतीय हवामान विभागाने राज्यासह देशातील अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाचा मोठा इशारा जारी केला आहे. अंदाजानुसार पुढील ४८ तास धोक्याची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. हवामानतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार पावसासोबतच काही भागांमध्ये चक्रीवादळाचीही शक्यता आहे, तर ४५ किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा इशारा दिला आहे.

राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. कधी पावसाने वातावरण गार करत आहे तर कधी थंडीचा प्रादुर्भाव जाणवतो. जानेवारी महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यात पावसाचे अनपेक्षित ढग निर्माण झाले असून थंडी कमी झाल्याचे नोंदले गेले आहे. डिसेंबर महिन्यात जरी राज्यात अधिक थंडी होती, तरी जानेवारीत वातावरणात अनपेक्षित बदल दिसून येत आहेत.मुंबईसह काही प्रमुख शहरांमध्ये वायू प्रदूषणही चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. नागरिकांना घशात त्रास, श्वास घेण्यात अडचण, सर्दी, खोकला यांसारखे श्वसन संबंधी आजार निर्माण होत असल्याचे अहवालातून दिसून आले आहे.

मुंबई महापालिकेच्या आयुक्तांना कोर्टाने वायू प्रदूषणाच्या बाबतीत कठोर सूचना दिल्या आहेत. हवामानातील बदलाचा थेट परिणाम आरोग्यावर होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुढील दोन ते तीन दिवस गारठा वाढण्याचे संकेत आहेत.

CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा दौरा

**अमरावती :** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा शनिवार दि. २४ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौरा आहे. दौऱ्यानुसार श्री. बावनकुळे सकाळी ११.३० ते १२.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे जनता दरबारात नागरिकांना भेटतील. दुपारी १ वाजता जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा नियोजन समिती सभा घेतील. सायंकाळी ५ वाजता जिल्हा नियोजन भवन येथे पत्रकार परिषद राहील. त्यानंतर सोईनुसार नागपूरकडे प्रयाण करतील.

**पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज जनता दरबार**

अमरावती, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा जनता दरबार शनिवार, दि. २४ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह येथे सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. जनता दरबारात पालकमंत्री श्री. बावनकुळे नागरिकांना भेटीसाठी उपलब्ध असतील. नागरिकांनी त्यांच्या तक्रारी, निवेदने सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महापौर पदासाठी ४४ मॅजिक आकडा जुळवण्यासाठी पालकमंत्री लावणार फिल्डिंग

## आमदार रवी राणांची मदत घेतल्याशिवाय भाजपचा महापौर होणे अशक्य

संदीप मानकर २४ जानेवारी



**अमरावती :** महापौर पदासाठी भाजपकडे २५ नगरसेवक आहेत. त्यांनी युवा स्वाभिमान पक्षाची युती केल्यास त्यांच्याकडे १५ नगरसेवक आहेत तर ४४ हा मॅजिक आकडा जुळवण्यासाठी आणखीन भाजपाला चार नगरसेवकांची गरज आहे हे चार नगरसेवक कोण? याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले असून भाजपा बसपाला सोबत घेते की शिंदे शिवसेना गटाला? याकडेही सर्वांचेच लक्ष लागले आहे . राज्यात महायुतीमध्ये असलेला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट मात्र अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते संजय खोडके यांनी स्वबळावर ८५ जागा लढवल्या. मात्र त्यांना ११ नगरसेवक निवडून आणण्यातच यश आले असून राज्यात महायुती आहे ते अमरावतीही कायम राहावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. ते भाजपाला मदत करेल की काँग्रेसला? याकडेही राजकीय जाणकारांचे लक्ष लागले आहे. कारण संजय खोडके व युवा स्वाभिमानचे नेते रवी राणा यांचे राजकीय वैर जग जाहीर आहे. त्यामुळे राणा भारतीय जनता पार्टी सोबत युती करत असतील तर आपण विरोधात बसणे पसंत करू असे खोडके दांपत्यांनी जाहिरात करून टाकले आहे. त्यामुळे भाजपही राष्ट्रवादी काँग्रेस पासून दूर राहा यासाठी माजी खासदार नवनीत राणा व आमदार रवी राणा यांचे जोरदार मोर्चे बांधणी सुरू आहे.

- महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री यांचा अमरावती दौरा त्यांचा जनता दरबार कार्यक्रम हा जरी शासकीय असला तरी तो राजकीय असल्याचे राजकीय जाणकार बोलत आहेत. ३० जानेवारी पर्यंत महापौर पदाच्या घडामोडी होतील.

- आता दोन दिवस सुट्टी असल्याने व प्रजासत्ताक दिन असल्याने या घडामोडी ही वाढले आहेत.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती त्यांची पूर्ण ताकद लावल्यानंतरही त्यांना पाहिजे तशी यश आले नाही. हे अपयश जरी असले तरी भाजपाने २५ जागा निवडून आल्याने भाजपा महापालिकेत मोठा पक्ष ठरला आहे. मात्र रवी राणा यांच्यासोबत युती तोडूनही रवी राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाच्या १५ जागा निवडून आणल्याने त्यांचे महत्त्व या निवडणुकीत वाढले आहे. दुसरीकडे काँग्रेसही ४४ हा मॅजिक आकडा जुळवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. काँग्रेसचे १५ नगरसेवक निवडून आले आहे, एम आय एम पक्षाचे १२ नगरसेवक, त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ११, बसपा ३ उबाठा २ वंचित बहुजन आघाडी ३ व शिंदे सेना ३ यांनी साथ दिल्यास काँग्रेसचाही महापौर अमरावतीत होऊ शकतो. तसे प्रयत्नही माझी पालकमंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे यांच्यावतीने करण्यात येत आहेत मात्र भाजपचे असे होऊ देणार नाही. राज्यात व केंद्रात त्यांची सत्ता असल्याने ते सत्तेचा पुरेपूर वापर भाजप करीत असून राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे पद असलेले महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे राजकीय गोटया फिट करण्यामध्ये माहीर आहेत. त्यामुळे त्यांनी अमरावतीत धाव घेतली आहे.

### महापौर पदासाठी ही रस्सीखेच महापौर पदाचे आरक्षण

सर्वसाधारण निघाल्याने पुरुष किंवा महिला महापौर होऊ शकतो. त्यामुळे सर्वच पक्षातून महापूर पदासाठी चुरस वाढली आहे. भाजपामध्ये महापौर पद मिळाल्यास काही सीनियर महिला सुद्धा निवडून आले आहेत . त्यांनीही माजी पालकमंत्री प्रवीण पोटे व राणादांपत्य यांच्याकडे साकडे घालने सुरू केले आहे. मात्र अमरावतीतला महापौर भाजपाचा जरी होईल तरीही युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या मर्जीतलाच होणार असल्याचे राजकीय जाणकारांची चर्चा आहे.

### नेत्यांचा राजीनामाच्या मुद्दा चांगलाच गाजला

सोशल मीडियावर माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी राजीनामा दिल्याची पोस्ट चांगलीच गाजली. मात्र हे राजकीय षडयंत्र असल्याचे सांगून पोटे यांनी जाहीर करून आपण कुठलाही राजीनामा दिला नसल्याचे त्यांनी मीडियाला सांगितले. भाजपामध्ये अंतर्गत वाद असल्याने निवडणुकीच्या अपयशानंतर प्रत्येक नेत्यांची वेगवेगळी अफवा उडत आहे.

आधी माजी खासदार नवनीत राणा यांनी भाजपच्या विरोधात काम करून अप्रत्यक्षरीत्या युवा स्वाभिमान ला मदत केली. त्यामुळे बऱ्याच नगरसेवकांचा पराभव झाला. अशी चर्चा अमरावतीत झाली. त्यामुळे त्यांच्या बाजूने काही नगरसेवकांनी राहून त्यांना त्यांचे समर्थन करण्याचाही प्रयत्न केला.त्यानंतर प्रवीण पोटे यांच्या बद्दलही अफवा उडवल्या गेली. त्यामुळे अमरावतीचे राजकारण कसे वाऱ्यासारखे बदलत आहे. त्याची प्रचिती अमरावती करांना आली.

दुसरीकडे आपापल्या पक्षाचे गटनेता नेमून तशी नोंदणी विभागीय आयुक्त कार्यालयात करणे सुरू आहे.

## घुईखेडच्या जंगी शंकरपटाला हिरवी झेंडी; २७ व २८ जानेवारीला बैलगाडा शर्यतीचा थरार, २ लाख ८५ हजारांची बक्षिसे

प्रतिनिधी २४ जानेवारी



**चांदुररेल्वे :** घुईखेड येथे आयोजित करण्यात येणाऱ्या जंगी शंकरपटाला अखेर हिरवी झेंडी मिळाली असून, येत्या २७ व २८ जानेवारी रोजी बैलगाडा शर्यतींचा थरार अनुभवता येणार आहे. या दोन दिवसीय शर्यतीत परिसरातील तसेच जिल्हाभरातील नामवंत बैलगाडा मालक व शर्यतप्रेमी सहभागी होणार असून, कार्यक्रमाबद्दल शेतकरी व ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

या शंकरपटामध्ये सहभागी होणाऱ्या विजेत्या बैलगाड्यांसाठी एकूण २ लाख ८५ हजार रुपयांची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. पारंपरिक पद्धतीने आणि नियमांचे पालन करून ही स्पर्धा पार पडणार असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. घुईखेड परिसरात बैलगाडा शर्यतींची परंपरा जुनी असून, दरवर्षी मोठ्या संख्येने प्रेक्षक या स्पर्धेला उपस्थित राहतात. यंदाही शंकरपटाला मिळालेल्या परवानगीमुळे शर्यतप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण असून, दोन दिवस घुईखेडमध्ये जल्लोष आणि उत्साह पाहायला मिळणार आहे.

## पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे आर्की-टेकलॉन्स- २६ व सांस्कृतिक कार्यक्रम

प्रतिनिधी २४ जानेवारी






**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील समूहातील टेकलॉन्स च्या कालावधीत पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर कॉलेज द्वारे दरवर्षी आर्की-टेकलॉन्स चे आयोजन करण्यात येते अनुषंगाने पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे राष्ट्रीय स्तरावरील भव्य उपक्रम 'आर्की-टेकलॉन्स २०२६' चे समारोप अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात जलसा या कार्यक्रमात संपन्न झाले यामध्ये विविध स्पर्धेत यश मिळेवलेल्या विध्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. आर्की-टेकलॉन्स २०२६ अंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्या मध्ये टग ऑफ वार मध्ये प्रथम क्र. सानिका जाधव, पार्थ देशमुख, सुहानी मालोकार द्वितीय क्र. ज्ञानेश्वरी कडू, आर्या लुंगे, वैभव देशमुख व तृतीय क्र. गीता खापरे पल्लवी घोगरे महंमद जकारिया फोटोग्राफी मध्ये प्रथम क्र. अंश कैतवास द्वितीय क्र. दानिया पठाण व तृतीय क्र. रियान खान, पेपर सबमिशन, मध्ये प्रथम क्र. खुशी जयस्वाल द्वितीय क्र. अनघा लांजेवार व तृतीय क्र. सुमित गभणे , पॉट पेंटिंग मध्ये प्रथम क्र. ऋषिका नागपूर द्वितीय क्र. ज्ञानेश्वरी कडू तृतीय क्र. सुहानी मालेकार, मॉडेल मेकिंग प्रथम क्र. अनघा लांजेवार द्वितीय क्र. वेदिका राऊत तृतीय क्र. पार्थ सगणे, आर्कीटेक्चरल मध्ये प्रथम क्र. अंश कैथवास द्वितीय क्र. प्रगती उके तृतीय क्र. पार्थ सगणे आणि ट्रेझर हंट मध्ये प्रथम क्र. दीक्षा राणे, संचाली द्वितीय क्र. अभय, मुक्ताई, राधिका हिंगे तृतीय क्र. सुहानी मालेकार पल्लवी घोगरे भाविका ठवकर यांनी पटकविले स्पर्धेचे परीक्षक आकि. 'अब्दुल हसब यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, परस्पर संवाद आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणण्यासाठी करण्यात आला आहे.

सर्वप्रथम जलसा चे उदघाट्न प्राचाय. 'संजय देशमुख यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले,आर्की-टेकलॉन्स चे संयोजक म्हणून प्रा. राम विघे तसेच जलसा चे संयोजक म्हणून प्रा. तृप्ती भामकर यांनी जबाबदारी पार पाडली कार्यक्रमाला प्रा. अमित घाडगे, प्रा. स्नेहल विधळे, प्रा. कीर्ती हिंगे,प्रा. भूपेंद्र जयस्वाल,प्रा. पलाश अग्रवाल, प्रा. दिशा अग्रवाल, प्रा. अंकुश खंडारे, उदय खोंडे ,हरीश पलसोकार उपस्थित होते.जलसा चे विध्यार्थी समन्व्यक पार्थ देशमूख, आरती भेंडे तसेच सूत्र संचालन आदिती वाकोडे, मिसबा शेख, सारा अलबीना, रियान खान यांनी अत्यन्त नियोजनबद्ध पद्धतीने केले या प्रसंगी समस्त कार्यालयीन कर्मचारी व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आयोजना बद्दल महाविद्यालयाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

## आरोग्य केंद्राच्या वऱ्हांड्यात महिलेची प्रसूती

प्रतिनिधी २४ जानेवारी

**धारणी:** तालुक्यातील अतिदुर्गम हतरू येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही डॉक्टर किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने एका गर्भवती महिलेला चक्क आरोग्य केंद्राच्या वऱ्हानड्यातच बाळाला जन्म द्यावा लागल्याची धक्कदायक घटना समोर आली आहे. या घटनेने मेळघाटातील आरोग्य सेवेचा बोजवारा पुन्हा एकदा उघड झाला आहे. चिखलदरा तालुक्यातील खुटिदा येथील रहिवासी प्रेमती सतीश बेठेकर यांना १३ जानेवारी रोजी प्रसूती कळा सुरू झाल्या. सकाळी ११.३० च्या सुमारास त्यांचे कुटुंबीय त्यांना तातडीने हतरू येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन आले. मात्र, यावेळी आरोग्य केंद्रात ना वैद्यकीय अधिकारी हजर होते, ना कोणी कर्मचारी. काही वेळ प्रतीक्षा केल्यानंतर प्रसूती कळा असह्य झाल्याने अखेर प्रेमती यांची आरोग्य केंद्राच्या वहांडयातच प्रसूती झाली. त्यांनी एका गोंडस मुलीला जन्म दिला. प्रसूतीनंतरही बराच वेळ आरोग्य केंद्रात कोणीही फिरकले नाही. कोणतीही वैद्यकीय मदत न मिळाल्याने अखेर हतबल झालेल्या कुटुंबाने माघारी फिरून महिलेला आणि नवजात अर्भकाला पुन्हा घरी नेले. या घटनेची माहिती मिळताच माजी आमदार राजकुमार पटेल यांनी प्रकरणाकडे लक्ष वेधले, तसेच दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. एकीकडे शासन मेळघाटात कोट्यवधी रुपये खर्च करत असल्याचा दावा करते, तर दुसरीकडे भरदिवसा आरोग्य केंद्रात कर्मचारी नसणे हे प्रशासनाचे मोठे अपयश आहे.

## महिलांनी स्वतःसाठी जगणे शिकले पाहिजे - विठ्ठल कांगणे

प्रतिनिधी २४ जानेवारी

### मुलींच्या मोबाईलच्या अतिरेकी वापरावर व्यक्त केली चिंता



**अमरावती :** जीवन जगत असताना महिलांनी कुटुंब व समाजासोबतच स्वतःसाठीही जगणे शिकले पाहिजे, असे प्रतिपादन वक्ते विठ्ठल कांगणे यांनी केले. ते एका कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांनी सध्याच्या काळात मुलींच्या मोबाईलवरील अतिरेकी वापरावर चिंता व्यक्त केली. विठ्ठल कांगणे यांनी सांगितले की, तंत्रज्ञान उपयुक्त असले तरी त्याचा अतिरेकी वापर मुलींच्या मानसिक आरोग्यावर आणि सामाजिक जडणघडणीवर परिणाम करत आहे. महिलांनी आत्मभान ठेवून स्वतःच्या क्षमतांचा विकास करावा, आत्मविश्वास वाढवावा आणि स्वतंत्र विचारांची कास धरावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित महिलांनी या विषयावर आपले अनुभव मांडले. महिलांचे सबलीकरण, जीवनमूल्ये आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत येणाऱ्या आव्हानांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना विभागीय आयुक्तालयात अभिवादन

प्रतिनिधी २४ जानेवारी



**अमरावती:** भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक श्रेष्ठ क्रांतिकारक नेते व आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन केले. जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अपर आयुक्त सुरज वाघमारे, संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. उपस्थितांनीही नेताजी सुभाषचंद्र बोस आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

मतदार दिनाची शपथ राष्ट्रीय मतदार दिनाच्या औचित्याने यावेळी विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना मतदार दिनाची शपथ दिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट

# खामगाव

## वीजचोरी करणाऱ्या पाच जणांविरोधात गुन्हा

### महावितरणच्या भरारी पथकाची कारवाई

प्रतिनिधी २४ जानेवारी

**खामगाव :** महावितरणच्या भरारी पथकाने हिवरखेड येथे केलेल्या तपासणीत वीजचोरीचे तीन वेगवेगळे प्रकार उघडकीस आले असून, याप्रकरणी पाच जणांविरोधात खामगाव शहर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.या तिन्ही प्रकरणांमध्ये फिर्यादी म्हणून अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत उत्तमराव कलोरे (वय ५२) यांनी तक्रार नोंदवली आहे. हिवरखेड गावात भरारी पथकाने तपासणी केली असता, आरोपींनी मीटर व सर्व्हिस वायरशी छेडछाड करून थेट विद्युत प्रवाह घेऊन वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले. तपासणीत असे आढळले की, साहेबराव हनवती हटकर यांनी मागील १२ महिन्यांत ५१४ युनिट वीज चोरी करून १२,४४० रुपयांचे नुकसान केले; कैलास सखाराम हटकर आणि सखाराम हनवत हटकर यांनी ५८२ युनिट वीज चोरी करून १२,८५७ रुपयांचे नुकसान केले; तर मोहन एच. हटकर आणि प्रशांत मोहन हटकर यांनी १४२८ युनिट वीज चोरी करून ३०,३४० रुपयांचे नुकसान केले आहे. या तिन्ही प्रकरणांत मिळालेला मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## वाहतुकीस अडथळा; ऑटोरिक्षा चालकाविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी २४ जानेवारी

**खामगाव :** तालुक्यातील टेंभूर्णा फाटानजीक रस्त्याच्या मधोमध ऑटोरिक्षा उभा करून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात ऑटोरिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा रात्री नोंदवण्यात आला.

प्रकरणी सुभाष रिंढे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, योगेश बाळकृष्ण गवळी (वय ३२, रा. आवार, ता. खामगाव) यांनी त्याच्या ताब्यातील ऑटोरिक्षा (क्रमांक एमएच-२८ टी-१३८४) टेंभूर्णा फाटानजीक प्रवासी निवाऱ्यासमोर, रस्त्याच्या मधोमध उभा केला होती. ही घटना रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकारामुळे ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले, तसेच संभाव्य अपघाताचा धोका निर्माण झाला. प्राप्त लेखी तक्रारीच्या आधारे खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम २८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार गोविंदा इंगळे करीत असून, पोलिसांकडून वाहनचालकांना वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जवळा बु. येथे गळफास घेऊन युवकाची आत्महत्या

प्रतिनिधी २४ जानेवारी

**खामगाव :** शेगाव तालुक्यातील जवळा बु, येथे ३० वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शांतेश प्रमोद सावदेकर (वय ३१, रा. जवळा बु,, ता. शेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. मृतकाचे नाव नागेश सहदेव सावदेकर (वय ३०, रा. जवळा बु, ता. शेगाव) असून, तो तक्रारदाराचा पुतण्या असल्याचे नमूद केले आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, २३ जानेवारी रोजी मृतकाने राहत्या घरालगत असलेल्या झोपडीत दोरीने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. मृतकाच्या आईने आरडाओरड केल्यानंतर नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली असता मृतक गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत आढळला. प्राथमिक तपासात, मृतकाने दारूच्या नशेत आत्महत्या केल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. पुढील तपास शेगाव ग्रामीण पोलिस करत आहेत.

## युग धर्म पब्लिक स्कूलमध्ये वसंत पंचमी उत्साहात साजरी



प्रतिनिधी २४ जानेवारी

**खामगाव :** युग धर्म पब्लिक स्कूलमध्ये आज वसंत पंचमीचा उत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल व मुख्याध्यापक अनिरुद्ध अवचार यांच्या हस्ते माता सरस्वतीचे पूजन करून करण्यात आली.

या प्रसंगी गोपाल अग्रवाल व अनिरुद्ध अवचार यांनी विद्यार्थ्यांना वसंत पंचमीचे सांस्कृतिक व शैक्षणिक महत्त्व सांगितले. तसेच अंकिता मॅडम व संगीता देशमुख यांनी वसंत पंचमीचा सण, ज्ञान, निसर्ग व नवचैतन्याचे प्रतीक असल्याचे स्पष्ट करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध सहभाग घेतला. संपूर्ण वातावरण भक्तिमय व आनंदी झाले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पायल मॅडम यांनी केले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व परंपरेबद्दल जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अडगांव बु. ग्रामपंचायतचे विविध विकासकामाचे नियोजन

प्रतिनिधी २४ जानेवारी

**अडगांव बु. :** येथील ग्रामपंचायतने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत १ ते ३१ डिसेंबर पर्यंत ३२ लाख ५० हजार रुपयांची घरपट्टी पाणिपट्टी ची विक्रमी वसुली झाली. त्यानुसार जमा झालेल्या वसुलीतुन ग्रामपंचायत च्या माध्यमातून गावातील विविध भागातील विकास कामाचे नियोजन करण्यात येवुन ग्रामपंचायतकडे असलेले पाणीपट्टी वीजबिलापोटी तब्बल १५ लाख रुपयांचा भरणा महावितरण ला करण्यात आला आहे, तसेच ४ लाख गावातील विविध ठिकाणी फ्लेवर रस्ता, २ लाख गावातील ठिकठिकाणी नाली बांधकाम, ५ लाख बुध्द विहारातील नालंदा सभागृह दुरस्ती, व इतर गावातील सुविधांसाठी तरतुद करण्यात आली असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली. सरपंच शोभा खंडारे, उपसरपंच मझरअली मिरसाहेब, गटनेता संजय राजनकार, ग्रामपंचायत सदस्य, व कर्मचारी वर्ग यांच्या धडाकेबाज नियोजनामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, गावच्या विकासाला आता नवी दिशा मिळणार असल्याचे दिसत आहे.

## संत दर्शनाने भगवंत प्राप्ती- हभप अरुण महाराज लांडे



प्रतिनिधी २४ जानेवारी


**अकोला:** संत दर्शन प्राप्ती असाध्य बाब आहे. कारण संत हा शिष्याच्या जीवनातील परिस असून संत दर्शनाने भगवंत प्राप्तीचा मार्ग दिसतो. साक्षात भगवंताचे दर्शन संतांच्या माध्यमातून होऊ शकते. म्हणून भगवंत प्राप्ती व शाश्वत सुखाची अभिलाषा बाळगणाऱ्या भक्तांनी संतांचा अनुग्रह सेवेच्या माध्यमातून प्राप्त करण्याचा हितोपदेश हभप अरुण महाराज लांडे यांनी दिला.स्थानीय फडके नगर येथील हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या संगीतमय रामायण व कीर्तन उत्सवात कीर्तनाचे चतुर्थ पुष्प पारस येथील कीर्तनकार हभप अरुण महाराज लांडे यांनी गुंफले.संत तुकोबारायांच्याठउजळलें भाग्य आतां,अवघी चिंता वारली,संतदर्शनें हा लाभ, पाद्मनाभ जोडला,संपुष्ट हे हृदयपेटीं, करुनि पोटीं सांठवूं,तुका म्हणे होता ठेवा, तो या भावा सांपडला,याअभंगवार त्यांनी आपले मार्मिक व श्रोत्यांना हसवित संगीतमय कीर्तन सादर केले. ते म्हणाले, जगाचे कल्याण कशात आहे याची चिंता संतांना आहे.

# तेल्हारा तालुक्यात रेती माफियांचा उच्छाद

## ◆ लिलावाविना घाट लुटले जात असताना प्रशासन गाढ झोपेत

प्रतिनिधी २४ जानेवारी

**तेल्हारा :** तालुका सध्या रेती माफियांच्या दहशतीखाली असून बेकायदेशीर रेती उत्खनन व वाहतुकीने अक्षरशः थैमान घातले आहे. लीलाव न झालेल्या नदीघाटांवरून रात्री बेरात्री ट्रॅक्टर, डंपर सारख्या वाहनांच्या रांगा लागत असून शासनाच्या डोळ्यादेखत कोट्यवधींची रेती चोरीला जात आहे. हा सारा प्रकार प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरू असताना वाहतूक विभाग, महसूल प्रशासन आणि संबंधित यंत्रणा मात्र संशयास्पद शांतता बाळगून आहेत. प्रश्न असा उपस्थित होतो की हे अधिकारी अज्ञानात आहेत की जाणूनबुजून डोळेझाक करत आहेत?



**महसुलाचा तोटा, पर्यावरणाचा ऱ्हास**

या बेकायदेशीर उत्खननामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात महसुलाचा फटका बसत आहे. नदीपात्रांचे संतुलन बिघडत असून भविष्यात पूर, भूक्षय आणि पर्यावरणीय आपत्ती ओढवण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण याची फिकीर कोणालाच नाही, असे सध्याचे चित्र आहे.

**लोकांचा सवाल – प्रशासन नेमके कुणासाठी?**

सामान्य नागरिक कायदा पाळतो, दंड भरतो, नियम पाळतो; पण रेती माफिया मात्र कायद्याच्या वर असल्यासारखे वागत आहेत. प्रशासनाने तात्काळ कठोर पावले उचलली नाहीत, तर जनतेचा प्रशासनावरील विश्वास पूर्णतः उडण्याची शक्यता आहे.

**रात्रीचा अंधार, माफियांचा उजेड**

दिवसा शांत दिसणारे घाट रात्री माफियांच्या ताब्यात जातात. अंधाराचा फायदा घेत खुलेआम उत्खनन, ओव्हरलोड वाहतूक, कोणतीही परवानगी नसताना रेतीची खुलेआम विक्री सुरू आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# वारी भैरवगड येथे नियमबाह्य बांधकाम; तहसीलदारांना शेतकऱ्यांचे निवेदन

प्रतिनिधी २४ जानेवारी



**तेल्हारा:** बाळापूर ६९ खेडी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत वारी भैरवगड (ता. तेल्हारा) येथे सुरू असलेले जलशुद्धीकरण प्रकल्पाचे बांधकाम पूर्णपणे अवैध असून, ते तातडीने थांबवण्यात यावे, या मागणीसाठी तेल्हारा तालुक्यातील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांनी माननीय तहसीलदारांना साकडे घातले आहे.

प्रशासकीय स्थगितीचे उल्लंघन शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात असा आरोप केला आहे की, या पाणीपुरवठा योजनेला स्थानिक स्तरावर प्रचंड विरोध आहे. तत्कालीन उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी ४ मार्च २०२३ रोजीच्या परिपत्रकाद्वारे (जावक क्र. १६७७) या प्रकल्पाला स्पष्ट स्थगिती दिली होती. विशेष म्हणजे, या पत्रावर मूळ कार्यकारी संचालकांची मान्यता असल्याचे स्पष्ट असतानाही, संबंधित यंत्रणांकडून नियमांचे उल्लंघन करून बांधकाम सुरू ठेवण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या परवानगीविना काम स्थानिक नागरिकांच्या मते, या कामासाठी कोणतीही अधिकृत परवानगी किंवा ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. याबाबत नागरिकांनी सांगितले की, ग्रामपंचायतीचा ठराव नसतानाही कंत्राटदार आणि त्रयस्थ कंपनी मनमानीपणे काम करत आहे. या निवेदनाद्वारे स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी प्रशासनाला तातडीने हस्तक्षेप करून हे अवैध बांधकाम थांबवण्याची विनंती केली आहे. अन्यथा, तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून दिला आहे.

# सिरसो येथे शिवमहापुराण व अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी २४ जानेवारी

**मूर्तिजापूर :** येथून जवळच असलेल्या सिरसो येथे २४ जानेवारी ते ३१ जानेवारीदरम्यान शिवमहापुराण कथा सोहळा; आळंदीचे ह.भ.प. विजय महाराज गव्हाणे यांच अमृततुल्य वाणीतून सिरसो येथील विठ्ठल रुख्माई संस्थान सभागृहात आयोजित केला आहे. हा सोहळा परिसरातील शिवभक्तांसाठी एक मोठी आध्यात्मिक पर्वणी ठरणाऱ्या शिवमहापुराण कथा व अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन २४ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. आळंदी येथील सुप्रसिद्ध कथावाचक ह.भ.प. विजय महाराज गव्हाणे यांच्या सुमधुर वाणीने शिवमहापुराण कथाकथन होणार आहे.

या सोहळ्यास ३९ वर्षे पूर्ण झाले असून, या आठ दिवसीय कथासोहळ्याची सुरुवात भव्य मिरवणुकीने होणार आहे. दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत शिवमहापुराण कथेचे प्रवचन होईल. त्याच बरोबर पहाटे ५ ते ६ काकड आरती, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व भजनी भारूड व रात्री ९ ते ११ असा दैनंदिन कार्यक्रम असून शनिवार २४ जानेवारी रोजी ह. भ. प. नागेश महाराज आगलावे बोरखेडकर यांचे किर्तन रविवार २५ जानेवारी रोजी ह.भ.प. नेत्रकांताताई वाढोणकर पिंपळखुटा अमरावती, २६ जानेवारी रोजी ह.भ.प. सुरेखाताई पाटील शेगाव, २७ जानेवारी रोजी विजय महाराज सुळे मालेगाव, २८ जानेवारी रोजी ह.भ.प. योगेश महाराज खवले कठोर शेगाव, २९ जानेवारी रोजी ह.भ.प. किशोर महाराज उगले अंजनगावसुर्जी, ३० जानेवारी रोजी रामभाऊ महाराज उन्हाळे शेगाव, तर ३१ जानेवारी रोजी ह.भ.प. विजय महाराज गव्हाणे आळंदी यांचे सकाळी १० ते १२ काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादने कार्यक्रमाची पुर्णाहूती होईल.

## खंडेलवाल महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**अकोला :** स्थानिक शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात पीएम उषा अंतर्गत संगणक व गणित विभागाच्या वतीने दोन दिवसीय कृत्रिम बुद्धिमत्ता आणि गणितीय विज्ञानातील नवोन्मेष आंतरराष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले.या चर्चा सत्राच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष डॉ ताराताई हातवळणे होत्या.तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ अविनाश कदम चिखली, प्राचार्य डॉ. जगदीश साबू, समन्वयक डॉ दीप्ती पेठकर, डॉ रवी रेवासकर, डॉ नितीन सुरडकर उपस्थित होते. दोन दिवसीय चर्चासत्रात पोस्टर प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. डॉ रूपाली काळे यांच्या अध्यक्षतेत सत्र संपन्न झाले. यावेळी कृत्रिम बुद्धिमत्ता, कम्प्युटर सायन्स, इंटरनेट थिंग्स, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, डीप लर्निंग याबाबत सखोल चर्चा व विचारांची आदान प्रदान करण्यात आली.

# इतिहासाच्या पानावर नेताजी अमर झाले - राम शेगोकार गुरुजी



प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला:** नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या राष्ट्रभक्तीचा अखंड दीप भारतीयांच्या अंतकरणात अखंड तेवत आहे. इतिहासाच्या पानावर नेताजी अमर झाले आहेत असे प्रतिपादन सेवा समितीचे कार्यवाह राम शेगोकार गुरुजी यांनी केले.

अकोला जिल्हा सेवा समितीच्या वतीने आयोजित नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती उत्सव कार्यक्रमात बोलत होते.सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड, बाबूजी देशमुख वाचनालयाचे सचिव अनुराग मिश्रा, अनिल मावळे, रूपाली तायडे, फय्याज मोहम्मद यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वतंत्रता सेनानी जी.के.वाघमारे दरवर्षी नेताजी सुभाषचंद्र चौक, मोहम्मद अली रोड येथे जयंती उत्सवाचे आयोजन करायचे. तोच वारसा पुढे चालवत त्यांची कन्या उषा आत्माराम तायडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यकर्त्यांनी परिसर स्वच्छ करून देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास हारार्पण करून अभिवादन केले.

अकोला जिल्हा सेवा समितीचे सचिव रवीकांत हुरपडे यांनी प्रास्ताविक केले. नेहरूजी व नेताजींचा खरा इतिहास तरुण पिढीसमोर मांडण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अनुराग मिश्रा यांनी केले. तर, सर्व जाती, धर्म, पंथ भेद विसरून राष्ट्राची एकात्मता अखंडीत राखणे हिच नेताजींना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन बबनराव कानकिरड यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रमोद रत्नपारखी यांनी केले. आभारप्रदर्शन वेदश्री विशाल तायडे यांनी केले.' एक बनेंगे - नेक बनेंगे,'' भारत माता की जय!', 'कश्मीर हो या कन्याकुमारी-भारत माता एक हमारी.' या घोषणेने कार्यक्रमाची सांगता झाली. माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, मनीष मिश्रा, सुरेश ढाकोलकर, राजाभाऊ चौधरी, रहेमान बाबू, माजी नगरसेवक शेख बुरहान मंतुवाले, सरदार खान, महादेवराव मेहेंगे, देवकाते साहेब, रामराव पाटेखेडे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.अकोला जिल्हा सेवा समिती, नशाबंदी मंडळ, सर्वोदय मंडळाचे कार्यकर्ते, नागरिक, विद्यार्थी या प्रसंगी उपस्थित होते.

# निर्माण ग्रुपचा १७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा




प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला:** निर्माण गृपचा १७ वा वर्धापनदिन साजरा झाला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे पंचभाई (अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी), उंदिरवाडे (संचालक शिक्षण विस्तार), डॉ. काळबांडे (अधिष्ठाता) उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, गणेश वंदना व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. निर्माण गृपचे जनरल मॅनेजर अभिजीत देशमुख यांनी प्रास्ताविकात निर्माण फर्टिलायझरची १७ वर्षांची वाटचाल, शून्यातून झालेली प्रगती आणि शेतकऱ्यांकरीता करण्यात येत असलेले मोलाचे कार्य याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच निर्माण मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे गजानन खोटरे (मुख्य सरव्यवस्थापक) यांनी संस्थेच्या स्थापनेचा उद्देश, आर्थिक प्रगतीचा लेखाजोखा मांडत सर्व ग्राहक, हितचिंतक, खातेदार व भागधारकांच्या विश्वासामुळेच संस्थेचा व्यवहार २५० कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सांगितले. डॉ. संजय देशमुख यांनी गणेशराव देशमुख यांचा गरिबीतून यशापर्यंतचा जीवनप्रवास, अ‍ॅग्रीकल्चर इंजिनिअरिंगची पदवी, निष्ठा, प्रामाणिकपणा व विश्वासाच्या बळावर निर्माण गृप आणि निर्माण मल्टीस्टेटची स्थापना कशी झाली यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमादरम्यान निर्माण गृपचे चेअरमन गणेशराव देशमुख यांच्या जीवनावर आधारित यशोगाथा चित्रफितीचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. गरिबीतील संघर्ष, शिक्षण, नोकरीतील कामगिरी, शेतकऱ्यांसाठी काहीतरी करण्याची जिद्द आणि त्यातून निर्माण फर्टिलायझरचा झालेला विकास या बाबी चित्रफितीत प्रभावीपणे मांडण्यात आल्या. ही चित्रफित पाहून सभागृह भारावून गेले. डॉ. पंचभाई यांनी गणेशराव देशमुख हे डॉ. पी.डी.के.व्ही. चे बी.टेक. (अ‍ॅग्री.) विद्यार्थी असून त्यांच्या कार्याचा विद्यापीठाला अभिमान असल्याचे सांगितले. तसेच निर्माण फर्टिलायझर शेतकऱ्यांसाठी सातत्याने संशोधन करून नवनवीन उत्पादने उपलब्ध करून देत असल्याचे नमूद केले. अध्यक्षीय भाषणात गणेशराव देशमुख यांनी निर्माण गृप हा शेतकरी व कष्टकऱ्यांसाठी कार्यरत असल्याचे सांगितले.

# विद्यार्थ्यांना खुले क्रीडांगण व अभ्यासिका हवी

प्रतिनिधी २४ जानेवारी

## ◆ नगर परिषदेकडे मागणी

**हिवरखेड:** गावाची नगरपरिषद झाली व निवडणूक सुद्धा पार पडली. या अनुषंगाने गावकऱ्यांच्या विकासाबाबत अपेक्षा सुद्धा वाढल्या. २३ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी व नगराध्यक्षा यांना निवेदनाद्वारे क्रीडांगण व अभ्यासिकेची मागणी केली. आपल्या गावातील तरुण तरुणी मोठ्या संख्येने सैन्यदलात वर्णी लावत असून विद्यार्थ्यांना आणखी सक्षम बनवण्याचे कार्य मात्र नगरपरिषदेने करावे, गावात शांत अभ्यासिका व ४०० मिटरचे क्रीडा संकुल उभारण्यात यावे जेणेकरून आर्मी, बी एस एफ, पोलिस, वनरक्षक, व इतर विविध स्पर्धा परीक्षा मध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैर सोय होणार नाही, अशा स्वरूपाचे निवेदन देऊन विद्यार्थी वर्गाकडून नगरपरिषदला साकडे घालण्यात आले. मात्र नगरपरिषद केव्हा विद्यार्थी वर्गाच्या ह्या अपेक्षा पूर्ण करते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



# ग्रामीण भागातील युवकांच्या जिद्दीची 'गगनभरारी'

प्रतिनिधी २४ जानेवारी

## ◆ एका अभ्यासिकेने सावरली २८ कुटुंब

**अडगांव बु.:** बदलत्या काळात स्पर्धा परीक्षेचे केंद्र पुणे-मुंबईसारखी शहरे मानली जातात. मात्र, ग्रामीण भागातील मुलांकडे जिद्द असेल आणि त्याला योग्य सोयींची जोड मिळाली, तर तेथील मुलेही इतिहास घडवू शकतात, हे अडगांव बु. येथील 'फ्रेंड सर्कल अभ्यासिके'ने सिद्ध केले आहे. तलाठी निलेश देऊळकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनातून आकाराला आलेल्या या अभ्यासिकेने अवघ्या काही वर्षांत २८ विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत पोहचवून यशाची 'गगनभरारी' घेतली आहे.

माणुस मोठा झाला की अनेकदा आपली पाळेमुळे विसरतो पण येथुन लागुनच असणाऱ्या शिवाजी नगर येथील शेतकरी कुटुंबातील काळया मातीतील एक जिद्दी व्यक्तीमत्व निलेश देऊळकार हे तलाठी पदावर शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर मि करु शकतो तर गावातील इतर मुल का नाही या विचाराने प्रेरीत होवुन निलेश देवुळकार यांनी सन २०१५



मधे फ्रेड सर्कल अभ्यासिकेची मुहूर्तमेढ रोवली आज याच अभ्यासिकेच्या माध्यमातुन अडगांव बु सारख्या ग्रामीण भागातील २८ तरुणांच्या आयुष्यात सरकारी नोकरी चा प्रकाश पसरवला आहे ११ वर्षांपूर्वी शिवाजीनगर येथे स्वखर्चातून एका छोट्या जागेत ही अभ्यासिका सुरू केली. सुरुवातीला काही पुस्तके आणि काही आवश्यक साहित्य दानशुर व्यक्तीनी दिले सर्वाच्या सहकार्य ने सुरु झालेला हा प्रवास आज एका मोठ्या वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद पाहून दोन वर्षांपूर्वी ही अभ्यासिका अडगांव बु बस स्टँडवरील एका भाड्याच्या इमारतीत हलवण्यात आली आणि तेथुनच खरा प्रगतीचा आलेख सुरू झाला संगणक,वायफाय पुस्तके, आदी सुविधेसह एदलापुर रोडवर सरावासाठी लोकवर्गणीतुन सुसज्ज मैदान तयार करण्यात येवुन त्याठिकाणी विद्यार्थी दररोज सराव करतात अभ्यासिकेत जवळपास ५० विद्यार्थी अभ्यास करतात.

या अभ्यासिकेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे शिकवण्यासाठी कोणतेही शिक्षक नाहीत मार्गदर्शक निलेश देवुळकार हेच दररोज आपल्या वेळातला वेळ काढुन एकदोन तास वेगवेगळा विषय शिकवतात इतर वेळी अनुभवी विद्यार्थी शिकवतात बाकी सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर' ही अभ्यासिका चालते थोडक्यात आत्मनिर्भर अभ्यासिका असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अत्यंत गरीब आणि तळागाळातील होतकरू विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून दिली आहे. एकमेकांच्या मदतीने अभ्यास करण्याच्या संस्कृतीमुळे आज या अभ्यासिकेने मोठ्या शहरांतील महागड्या क्लासेसलाही मागे टाकले आहे.

या अभ्यासिकेच्याकेच्या माध्यमातून संदीप कळसकार ,सागर तुंबडे, मनीष बोंबटकर ,सागर वानखडे, वैभव खिरोडकर, वैभव निमकर्डे, विजय डाबेराव, सुमेध सावळे ,धीरज डाबेराव , प्रतीक वानखडे अभिषेक कौठकार, गौतम खंडेराव, शुभम भोकरे, शुभम अढाऊ,पवन मानकर, ऋषिकेश लापुरकार, निखिल अस्वार , मनीष वानखडे ,रोहित काळपांडे, गणेश चिम, नरेश पाटेकर, हर्षदीप डोंगरे विशाल शिंदे, किशोर ठोसर, अनुप इंगळे , शिवा अवचार, शुभम इंगळे, यश नेमाडे यांसारख्या २८ तरुणांनी शासकीय सेवेत यश मिळवले आहे. या उपक्रमामुळे आज अडगांव बु नाव संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाने घेतले जात आहे. ग्रामीण भागातील मुलांसाठी ही अभ्यासिका खऱ्या अर्थाने 'यशाची गुरुकिल्ली' ठरत आहे.

## डॉ.अशोक शिरसाट यांना ग्राहक रक्षक समितीतर्फे राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार जाहीर

प्रतिनिधी २४ जानेवारी



**अकोला:** येथील कवी, साहित्यिक डॉ.अशोक शिरसाट यांना निती आयोग अंतर्गत ग्राहक रक्षक समिती तर्फे शैक्षणिक, साहित्यिक , सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार - २०२६ करिता निवड करण्यात आली. ग्राहक रक्षक समितीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. आशाताई पाटील यांनी डॉ. शिरसाट यांना निवडपत्र देवून मनःपूर्वक अभिनंदन केले आहे .डॉ. अशोक शिरसाट यांची कविता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये सन-२०२४ ला बी.ए.भाग -३ च्या मराठी पाठ्यपुस्तकांत समाविष्ट करण्यात आली आहे. ५ कविता संग्रह , २ कथासंग्रह तसेच महाराष्ट्रातील नामवंत लेखकांनी डॉ.अशोक शिरसाट यांच्या समग्र साहित्यावर ३ समिक्षा ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

# केशवनगर परिसरात श्रीमद देवी भागवत तथा पंचकुंडात्मक शतचंडी याग उत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला:** श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ, संभाजीनगर संचालित श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने येथील केशवनगर परिसरात श्रीमद् देवी भागवत सप्ताह व पंचकुंडात्मक शतचंडी याग उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कथा निरूपणकार म्हणून भागवताचार्य अंबरीश महाराज जोशी सोनईकर हे लाभणार आहेत.

या उत्सवात पंचकुंडात्मक शतचंडी याग ही होणार असून पंचक्रोशीतील महिला पुरुष भक्तांसाठी ही मोठी पर्वणी श्री जगदंब परिवाराच्या माध्यमातून उपलब्ध झाली असल्याची माहिती जगदंब परिवार अकोलाच्या वतीने शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. मंगळवार, २७ जानेवारी ते सोमवार २ फेब्रुवारी पर्यंत केशवनगर परिसरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात ही कथा होणार आहे. श्री हरिहर सद्गुरू शक्तीपीठ संभाजीनगरच्या पू. गिरजामाता आईसाहेब यांच्या आशीर्वादाने व प पु



सद्गुरु पिठाधिश्वर श्री अप्पा महाराज यांच्या पावन स्मृतीत हे आयोजन होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. २६ जानेवारी ते २ फेब्रुवारी पर्यंत सायंकाळी ५-३० ते रात्री ८ वाजेपर्यंत ही कथा होणार आहे.

२६ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता श्रीमद देवी भागवत ग्रंथाची शोभायात्रा परिसरात आयोजित करण्यात आली आहे.कथास्थळी दररोज सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत भजन, पूजन व हवन होऊन सायं ५ वाजता श्रीसूक्त, योगपिठासन स्त्रोत व कुंजिकास्त्रोत पठण होणार आहे. नित्य स ६ वाजता काकडा, सकाळी ७ वाजता सद्गुरु पादुका पूजन, सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत दुर्गा सप्तशती पाठ होणार आहे. २९ जानेवारी रोजी पूज्य श्री अनिरुद्ध महाराज, संभाजीनगर यांची पावन उपस्थिती उत्सवात लाभणार आहे. सोमवार दिनांक २ फेब्रुवारी रोजी स १० वाजता देवी भागवत कथा व शतचंडी यागाची पूर्णाहुती व दु १२ वाजता महाआरती होऊन महाप्रसादाने या उत्सवाची सांगता होणार होणार आहे.या उत्सवासाठी भव्य मंडप साकारण्यात आला असून यागासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. पंचक्रोशीतील महिला पुरुष भक्तांनी या श्रीमद् देवीभागवत सप्ताह व पंचकुंडात्मक शतचंडी याग उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या पत्रकार परिषदेत श्रीजगदंब परिवाराचे सेवेकरी शैलेशराव देशमुख, प्रदीप कुलकर्णी, सुनील कुऱ्हेकर, दिनेश जोशी, निखिल देशमुख, मंदार देशपांडे, गणेश दलाल, विवेक देशपांडे, मयंक देशपांडे, विनायकराव जोशी आदी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# ऑनर किलिंग : जावयाचा निर्घृण खून

## सासरा व मेव्हण्याला अटक

प्रतिनिधी २४ जानेवारी

**महागाव :** प्रेमविवाहाच्या जुन्या रागातून सासरच्या मंडळींनी जावयालाच संपवल्याची थरकाप उडवणारी घटना महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथे घडली आहे. व्यवसाय उभारणीचे आमिष दाखवून तरुणाला गावात बोलावून घेत मध्यरात्री त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी महागाव पोलिसांनी सासरा आणि मेव्हण्याला अटक केली आहे.

दाखवून तरुणाला गावात बोलावून घेत मध्यरात्री त्याची निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी महागाव पोलिसांनी सासरा आणि मेव्हण्याला अटक केली आहे.

अनुज जाधव (वय ३०) रा. कानपूर देहात उत्तर प्रदेश असे मृतकाचे नाव आहे. तर भारत सिंह जाधव (५२) व रवी जाधव (२६) अशी आरोपींची नावे आहे.

मृतक अनुज जाधव (वय ३०) याने ८ जानेवारी २०१८ रोजी पिंकी देवी हिच्याशी अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रेमविवाह केला होता. मात्र या विवाहामुळे पिंकीचे वडील भारत सिंह जाधव आणि भाऊ रवी जाधव हे संतप्त होते. विवाहानंतर अनुजला सातत्याने जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या.

अनुज पत्नी व मुलांसह मध्य प्रदेशातील राजगढ येथे वास्तव्यास होता. मात्र जून २०२५ मध्ये सासरच्या मंडळींनी विश्वास संपादन करत व्यवसायाचे आमिष दाखवून फुलसावंगी येथे राहण्यासाठी बोलावून घेतले. हाच विश्वास त्याच्या जीवावर बेतला.

६ जानेवारी २०२६ च्या रात्री ११ ते ७ जानेवारीच्या पहाटे दरम्यान भारत सिंह जाधव (५२) व रवी जाधव (२६) यांनी संगनमत करून अनुजवर प्राणघातक हल्ला केला. सकाळी अनुजचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला. डोक्याच्या मागील भागावर गंभीर जखमा आढळल्याने हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने झाल्याचे स्पष्ट झाले.

मृतकाचा भाऊ नेकपाल सिंह जाधव याने दिलेल्या फिर्यादीवरून महागाव पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३(५), ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून ही हत्या ऑनर किलिंगमधूनच झाली का? या दिशेनेही पोलिस तपास करत आहेत.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड करत आहेत.

## राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी २४ जानेवारी

**यवतमाळ :** स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक व महाराष्ट्र दिन राज्यभर साजरा करण्यात येतात. यावेळी राष्ट्रध्वजाचा उचित सन्मान व्हावा हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे कर्तव्य आहे. त्यामुळे 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनी प्लॅस्टीक ध्वजाचा वापर करु नये.

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता होय. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होता कामा नये. राष्ट्रध्वजाचा योग्य मान राखण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक असल्याने स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, सुजाण व जागरुक नागरिक, ग्रामपंचायत, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, आरोग्य संस्था, सर्व खाजगी संस्था यांनी स्थानिक पोलीस यंत्रणेच्या मदतीने अशा प्रकारे प्लॅस्टीकच्या राष्ट्रध्वजाचा वापर होणार नाही याबाबत काळजी घ्यावी तसेच विक्रेत्यांनी प्लॅस्टीकच्या राष्ट्रध्वजाची विक्री करु नये. प्लॅस्टीकचे ध्वज आढळुन आल्यास संबंधित तहसिलदार किंवा नगरपालिका कार्यालयात असे ध्वज जमा करावेत. तसेच 26 जानेवारी या कार्यक्रमा प्रसंगी जिल्ह्यातील नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी प्लॅस्टीक राष्ट्रध्वजाचा वापर करु नये, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी आमदारांना निवेदन



## राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २४ जानेवारी

**झरी जामणी :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संबंधित आमदारांना निवेदन सादर करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून मनरेगा योजनेत कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असतानाही त्यांच्या सेवा-सुरक्षा व भवितव्याबाबत शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, अशी तीव्र नाराजी यावेळी व्यक्त करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मनरेगा अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना इतर योजनांतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित किंवा समायोजित करण्यात यावे. तसेच S-2 इन्फोटेक कंपनीमार्फत सुरू असलेली अनधिकृत व अवैध भरती प्रक्रिया तात्काळ थांबवून संबंधित कंपनीचा करार रद्द करण्यात यावा. सध्याच्या कर्मचाऱ्यांना राज्य निधी असोसिएशन (सोसायटी) मार्फत नियुक्ती देऊन "समान काम – समान वेतन" हे धोरण लागू करण्याची मागणीही करण्यात आली आहे. यासोबतच मनरेगा विभागासाठी स्वतंत्र आकृतिबंध (कॅडर स्ट्रक्चर) तयार करून पदनिहाय संरचना निश्चित करावी, अशी ठोस मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वारंवार निवेदने, आंदोलने व स्मरणपत्रे देऊनही शासनाकडून कोणतीही सकारात्मक दखल घेतली जात नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या सर्व मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय हेतूने नसून, केवळ न्याय्य मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने करण्यात येणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

लोकप्रतिनिधी म्हणून आमदारांनी या विषयात लक्ष घालून संबंधित मंत्री व विभागाशी चर्चा करावी, विधानसभेत प्रश्न उपस्थित करावा तसेच शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी मध्यस्थी करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

आमदार संजय देरकर यांना निवेदन सादर करतेवेळी योगिता काकडे (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी), अभिजीत जिड्डेवार व रमेश राठोड (तांत्रिक सहाय्यक), संतोष मेंढे व राजेश कर्नेवार (क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर) उपस्थित होते.

# वकिलासोबत हुज्जत; जिल्हा वकील संघाची पोलिस ठाण्यात धडक

प्रतिनिधी २४ जानेवारी

**यवतमाळ :** कौटुंबिक न्यायालयात सुरू असलेल्या एका प्रकरणावर एका पक्षकाराने विरोधी वकिलाला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेमुळे यवतमाळ जिल्हा वकील संघात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचा निषेध करीत वकीलांनी शहर पोलीस ठाण्यात धडक दिली.



कौटुंबिक न्यायालयात पती-पत्नीच्या वादासंदर्भात प्रकरण सुरू आहे. शुक्रवारी या प्रकरणाच्या युक्तिवादानंतर संबंधित पक्षकाराने नागपूर येथील वकिलाला खुलेआम शिवीगाळ केली आणि धमकी दिली. यामुळे न्यायालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर जिल्हा वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस ठाण्यात धडक देत ठाणेदार रामकृष्ण जाधव यांची भेट घेतली. त्यांनी या घटनेची माहिती देत, अश्लील भाषेत शिवीगाळ करणाऱ्या पक्षकारावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच वकिलांना योग्य सुरक्षा देण्याचेही निवेदनात म्हटले. वकिल संघाच्या या निषेधाच्या मोहिमेत जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष संजय जैन, ॲड. अमित बदनोरे, ॲड. मीनाजउद्दीन मन्नस, ॲड. शीतल जयस्वाल, ॲड. कोमल पटेलिया, ॲड. विपिन ठाकरे आणि इतर वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते. यवतमाळ शहर पोलिसांनी या प्रकरणावर तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

# शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जन्मशताब्दी साजरी

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

प्रतिनिधी २४ जानेवारी

**यवतमाळ :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त यवतमाळ शहर शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीच्या वतीने दाते कॉलेज चौक येथे आज गुरुवारी भव्य अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांच्या प्रास्ताविकाने झाली. पालकमंत्री संजय राठोड यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.



युवासेनेच्या वतीने प्रद्युम्न जवळेकर यांच्या संकल्पनेतून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी 'चालू घडामोडी' विषयाच्या पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबवलेल्या या उपक्रमाचे पालकमंत्र्यांनी विशेष कौतुक केले. यानंतर दाते कॉलेज परिसरात अन्नदानाचेही आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला पश्चिम विदर्भ समन्वयक पराग पिंगळे, जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, जिल्हा समन्वयक संजय हातगावकर, सुरेश चिंचोळकर (पश्चिम विदर्भ समन्वयक, आदिवासी विभाग) आणि संजय रंगे यांची उपस्थिती होती.

तसेच महिला आघाडी जिल्हाप्रमुख दर्शना इंगोले, युवासेना लोकसभा प्रमुख विशाल गणात्रा, शहरप्रमुख निलेश बेलोकार, महिला शहरप्रमुख सरला इंगळे, महेश पवार, फिरोज पठाण, अजय खोंड, बाळासाहेब शिंदे, प्रवीण निमोदिया, ज्योती चिखलकर, सौरभ तिवारी, संजय उपगंनलावार, पद्माकर काळे, रमेश अग्रवाल, राहुल गंभीरे आणि राजू चांदेकर उपस्थित होते.

कार्यक्रमात नवनिर्वाचित नगरसेवक चैताली बेलोकार, लोकेश इंगोले, पिंटू बांगर, सपना उपगनलावार, आकाश परतेकी, पूजा गायकी, शोभा साबळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल कांबळे यांनी केले, तर आभार ज्ञानेश्वर चव्हाण यांनी मानले.

# पुसद शहराचा कचरा इंदिरानगर येथे जाळला

## वंचित बहुजन आघाडीची नगराध्यक्षांकडे कारवाईची मागणी

प्रतिनिधी २४ जानेवारी

**पुसद :** पुसद नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील ओला व सुका कचरा इंदिरानगर (ता. पुसद) ग्रामपंचायत हद्दीतील डम्पिंग यार्डमध्ये खुलेआम टाकून जाळला जात असल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे. या प्रकरणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पुसद नगरपरिषदेचे नगराध्यक्ष यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे.



वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक बुद्धरत्न भालेराव, तालुका अध्यक्ष संदीप आढाव व तालुका महासचिव जयानंद उबाळे यांनी डम्पिंग यार्डची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी कोणतीही वैज्ञानिक प्रक्रिया न करता कचरा जाळला जात असल्याचे निदर्शनास आले. सदर डम्पिंग यार्ड वस्तीला लागून असल्याने निर्माण होणारा दाट धूर थेट रस्त्यावर तसेच नागरिकांच्या घरांमध्ये शिरत असून, यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

पाहणीदरम्यान ओला व सुका कचरा वेगळा न करता एकत्रित टाकण्यात येत असल्याचे आढळून आले. कचरा प्रक्रिया करणारी यंत्रणा बंद अवस्थेत असून, डम्पिंग यार्डवर वजनकाटा, इन्चार्ज अधिकारी व चौकीदार नसल्याचेही स्पष्ट झाले. कचऱ्याच्या ढिगाऱ्यात मृत प्राणी आढळून आल्याने त्यांनाही कचऱ्यासोबत जाळले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकाराकडे नगराध्यक्षांनी तातडीने लक्ष देऊन कचरा जाळणे बंद करावे, कचरा व्यवस्थापनासाठी वैज्ञानिक पद्धतींची अंमलबजावणी करावी व संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# निष्ठावंतांना डावलण्याची सुपारी घेतली का?

## जिल्हा संपर्कप्रमुखांवर पळसकरांचा घाणाघात

प्रतिनिधी २४ जानेवारी

**उमरखेड :** "पक्ष आपली खासगी मालमत्ता असल्यासारखा कारभार करणाऱ्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांमुळे उबाठा शिवसेनेत असंतोषाचा भडका उडाला आहे," असा घनाघाती आरोप करत जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी जिल्हा संपर्कप्रमुखांवर थेट निशाणा साधला आहे. उमरखेड येथे शहरप्रमुख पदाच्या वाटपावरून पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला असून, निष्ठावंत शिवसैनिकांना डावलत परस्पर निर्णय घेतल्याने संघटना कमकुवत होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



स्थानिक विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना पळसकर यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात पार पडलेल्या बैठकीत जिल्हा संपर्कप्रमुख राजेंद्र गायकवाड आणि जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे यांनी स्थानिक कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता थेट माजी नगरसेवक संदीप ठाकरे यांची शहरप्रमुखपदी नियुक्ती केली. या निर्णयामुळे उमरखेड शहरात तीव्र असंतोष पसरला आहे.

"डॉ. अजय नरवाडे, राहुल सोनवणे, नितीन शिंदे, प्रशांत पत्तेवार यांसारखे निष्ठावंत शिवसैनिक अनेक वर्षांपासून पक्षासाठी झटत आहेत. मात्र अशा कार्यकर्त्यांना डावलून पदवाटप करणे म्हणजे शिवसैनिकांचा अपमान आहे," असा आरोप पळसकर यांनी केला.

यावेळी त्यांनी थेट पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे दाद मागत,

"जिल्हा संपर्कप्रमुख स्वतःला निष्ठावंत म्हणवून घेत असतील, तर त्यांनीच निष्ठावंतांना डावलण्याची सुपारी घेतली आहे का?" असा खडा सवाल उपस्थित केला. याआधीही तालुकाप्रमुख, जिल्हाप्रमुख व जिल्हा संपर्कप्रमुख यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून अनेक कार्यकर्त्यांनी पक्ष सोडल्याचा आरोप करत,

"अशीच परिस्थिती कायम राहिली, तर आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत त्याचे गंभीर पडसाद उमटतील," असा इशाराही देण्यात आला.

डॉ. अजय नरवाडे यांना शहरप्रमुख पद द्यावे, ही सर्वसाधारण शिवसैनिकांची भावना असताना वरिष्ठांनी कार्यकर्त्यांना डावलून निर्णय घेतल्याने उमरखेड शहरात दोन गट पडण्याची शक्यता निर्माण झाल्याचेही पळसकर यांनी स्पष्ट केले.

"शिवसेना कोणाच्या वैयक्तिक मालकीचा पक्ष नाही. बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर प्रेम करणारे आजही असंख्य शिवसैनिक आहेत. मात्र जिल्हास्तरावरील मनमानी थांबली नाही, तर पक्षातून मोठ्या प्रमाणावर गळती अटळ आहे," असा इशाराही त्यांनी शेवटी दिला.

या वादावर आता पक्षप्रमुख उद्धव ठाकरे काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी सुवर्णा इंगोले

प्रतिनिधी २४ जानेवारी

**आर्णी :** महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे अंतर्गत आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी सुवर्णा भिमराव इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या सध्या शासकीय इंग्रजी माध्यम आश्रमशाळा, पाळोदी (ता. आर्णी, जि. यवतमाळ) येथे स्त्री-अधिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.



महासंघाच्या अधिकृत आदेशानुसार, प्राप्त अधिकार व शक्तींच्या अधीन राहून ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या नियुक्तीमुळे आदिवासी विकास विभागातील महिला कर्मचाऱ्यांच्या संघटनात्मक कार्याला नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा महासंघाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

श्रीमती सुवर्णा इंगोले या शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील अनुभवी अधिकारी म्हणून परिचित असून, त्यांच्या नेतृत्वाखाली महिला कर्मचारी संघटना अधिक सक्षम व संघटित होईल, असा विश्वास महासंघाने व्यक्त केला आहे. त्यांच्या पुढील कार्यासाठी महासंघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार- शंकर मधुकर राठोड रा साई (ई) ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता कु.प्राची शंकर राठोड जन्म/सचिव ग्रा.पचायत साई (ई) ता. महागांव येथे दि. 07/04/2013 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पचायत साई (ई) नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

स्वा./-
शिक्का
तहसीलदार साहेब
तहसिल कार्यालय महागाव

## जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार- शंकर मधुकर राठोड रा साई (ई) ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता कु.मोनिका शंकर राठोड जन्म/सचिव ग्रा. पचायत साई (ई) ता. महागांव येथे दि 01/05/2012 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पचायत साई (ई) नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

स्वा./-
शिक्का
तहसीलदार साहेब
तहसिल कार्यालय महागाव

## जाहीरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार- प्रमोद गुलाब चव्हाण रा साई (ई) ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुली करीता कु. तनुजा प्रमोद चव्हाण जन्म/सचिव ग्रा.पचायत साई (ई) ता. महागांव येथे दि 30/12/2009 रोजी झाला आहे, परंतु त्यांच्या जन्माची नोंद. सचिव. ग्रा.पचायत साई (ई) नगरपंचायत, महागांव येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म नोंदणी अधिनियम कलम 13 (3) नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर केले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असेल तर त्यांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

स्वा./-
शिक्का
तहसीलदार साहेब
तहसिल कार्यालय महागाव

५
# सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. २४ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचा समारोप



**वाशीम:** मागील ३ दिवसापासुन जिल्हा परिषदेच्याअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप शनिवारी रात्री सायंकाळी ८.३० वाजता झाला. वाशिम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, मुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद गणविर, ? जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशिल पाटील, कारंजा गट विकास अधिकारी पुनम राणे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने आदिंची मंचावर उपस्थिती होती. या स्पर्धांमध्ये विविध मैदानी व इनडोअर क्रीडा प्रकारांमध्ये सर्व पंचायत समिती आणि मुख्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वितरण करण्यात आले.

# कामात दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी...
# अनेक कर्मचारी निलंबित, मात्र कारवाई प्रलंबित !

## *कृषी विभागातील १६ कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार * बातमी बितंबित, कारवाई होणार निश्चित

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेअंतर्गत बनावट दस्तऐवजाच्या आधारे सिंचन विहिरी आणि बोगस फळबाग लागवडीच्या नावाखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले असल्याची तक्रार राज्यभर गाजत आहे. सदर गैरप्रकाराची प्राथमिक चौकशी करण्यात आली असून पुढील कारवाई अद्यापही समोर आली नसली तरी, कृषी विभागात कामात दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची धडक कारवाई करण्यात आली असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र प्राथमिक चौकशीनंतर अंतिम विभागीय चौकशी रेंगाळत पडल्याने त्या १६ जणांवरील निलंबनाची कारवाई प्रलंबित असल्याचे बोलले जात आहे. आपल्याच विभागातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी यांनी केलेले पाप झाकण्यासाठी कृषी विभागाच्या प्रशासनाकडून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात असल्यचा आरोप सर्व सामान्य शेतकरी करीत आहेत. परिणामी पोकरा घोटाळा आणि ईतर कामात जाणीवपूर्वक करण्यात आलेली दिरंगाई व शिस्तभंगाच्या कारवाईतील निलंबन प्रदीर्घ काळ लोटूनही प्रलंबित असल्याने प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

पश्चिम विदर्भात कामातील दिरंगाईमुळे ११ अधिकारी - कर्मचारी, तर कुही तालुक्यात अनुदान गैरव्यवहारप्रकरणी ७ कर्मचारी आणि वाशिम जिल्ह्यात शेतकऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी तालुका कृषी अधिकारी निलंबित करण्यात आले आहेत. त्यातच जिल्ह्यात पोकरा योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याची तक्रार समोर आल्याने कृषी विभागात खळबळ उडाली आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दाखल करून विविध वरिष्ठ स्तरांवर सुद्धा सादर केली आहे. त्यामुळे सदर पोकरा प्रकरणाने संपूर्ण जिल्हा ढवळून निघाला आहे. जिल्ह्यातील आघाडीच्या विविध वृत्तपत्रांनी सदर गैरप्रकाराचा मुद्दा उचलून धरल्याने या प्रकरणात चौकशी अधिकारी म्हणून अनिल राठोड तंत्र अधिकारी यांनी प्राथमिक चौकशी करून अहवाल वरिष्ठांकडे पाठविला असल्याची माहिती सूत्र देत आहे. मात्र पुढील कारवाई अद्यापही गुलदस्त्यातच अडकलेली आहे. तक्रारदार यांनी सादर केलेले सर्व पुरावे आणि तपास अधिकारी यांनी केलेली स्थळ पाहणी यावरून तक्रारीतील गांभीर्य अधोरेखित झाले आहे. तरीसुद्धा कारवाईस विलंब होत असल्याने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप सर्व सामान्य जनता करीत आहे. ज्या प्रकरणात कुठलेही फळझाड न लावता पती आणि पत्नीच्या नावावर फळबाग लागवड योजनेखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले गेले. शिवाय पतीच्या नावावर जुनी विहीर असताना त्याच गटात पत्नीच्या नावावर पोकरा योजनेतून नवी विहीर देणे हे सर्व नियमबाह्य आहे. त्याचे सर्व पुरावे तक्रारदार वसंत खडसे यांनी तक्रारी सोबतच सादर केले आहेत. शिवाय प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून हा सर्व प्रकार तपास अधिकारी अनिल राठोड यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिला आहे. आता यावर वरिष्ठ स्तरावरून काय कारवाई होते याकडे संपूर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागले आहे. तर याआधीच्या अनेक प्रकरणांमध्ये कामात दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी कृषी विभागातील किमान १५ ते १६ कर्मचारी दोषी ठरवून त्यांच्यावर निलंबनाची टांगती तलवार कायम असल्याची विश्वसनीय माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र आर्थिक देवाण - घेवाण करून दोषींना वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. ही गंभीर बाब सबंधित प्रशासनाचा पारदर्शकपणा संशयाच्या भोवऱ्यात अडकवत आहे. परिणामी सामान्य जनतेचा वरिष्ठ स्तरांवरील विश्वासार्हतेला तडा जात असल्याचे वास्तव समोर येत आहे. शेतकऱ्यांचे हक्काचे शासकीय अनुदान काही कृषी सहाय्यकांनी आपल्या बापदादयाची जागीर समजून मर्जीतल्या लोकांना खिरापत वाटल्याप्रमाणे वितरित करणे ही कृषी विभागासाठी लांच्छनास्पद बाब आहे. जिथे किमान २० ते २५ शेतकरी समाधानी करायचे ते सोडून एकाच कुटुंबात लाखों रुपयांचे अनुदान वितरित करून स्वतःचे उखळ पांढरे करून घेतले हे कितपत योग्य आहे? असा प्रश्न पोकरा योजनेच्या लाभापासून वंचित असलेले शेतकरी विचारत आहेत. हा धक्कादायक गैरप्रकार पुराव्यासहित उघड झाला असतांना सुद्धा प्रशासन अद्यापही गप्प असल्याने जिल्हवासी आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

### चौकशीचा केवळ फार्स नको, तर दोषींवर कारवाई करा - शेतकऱ्यांची मागणी

वाशिम जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा भाग एक योजनेतील गैरप्रकार आता संपूर्ण राज्यात चव्हाट्यावर आला आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील गैरप्रकाराचे पुराव्यांनी पोकरा योजनेतील भ्रष्टाचाराचे पितळ उघडे पाडले आहे. अशाच गंभीर प्रकारातून नांदेड जिल्ह्यातील तुषार संच, ठिंबक संच, विहिरी, फळबाग लागवड आणि ईतर घटकात तब्बल ६ कोटींची शासनाची फसवणूक केल्याचे सिद्ध झाले आहे. या प्रकरणात दोन कृषी पर्यवेक्षकांसह, सहा कृषी सहाय्यक आणि खोटे दस्तऐवज सादर करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत अखेर विभागीय कृषी सहसंचालकांनी ६ कर्मचाऱ्यांना निलंबित करून फसवणूक करणाऱ्यांकडून सक्त वसुली तर केलीच शिवाय विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. अशीच कारवाई वाशिम जिल्ह्यातील भ्रष्टाचाऱ्यांविरोधात करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त करत केवळ चौकशीचा फार्स नको, तर दोषींवर कारवाई करा अशी मागणी जिल्ह्यातील सर्व सामान्य शेतकरी करीत आहेत.









## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात व्याख्यान व निबंध स्पर्धा

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा द्वारा संचालित, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र शासन उच्च, शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या सूचनेनुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आज दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शरद वाघोळे, मराठी विभाग प्रमुख हे उपस्थित होते.



# आंदोलनातून मिळेना न्याय, दिव्यांगावर १८ वर्षापासून अन्याय !

## * सहनशिलतेचा संपला अंत, अधिकाऱ्यांना नाही खंत * आता २६ जानेवारीला नाही राहायचे जीवंत...

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथील दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखडे यांची शेतजमीन अधिकाऱ्यांनी कागदोपत्री चोरली आहे. ती परत मिळविण्यासाठी गेल्या १८ वर्षापासून लोकशाही व्यवस्थेनुसार प्रशासनाशी लढत आहेत. निवेदन, आंदोलन, उपोषण करून न्याय मिळत नसल्याने दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांच्या सहनशिलतेचा अंत संपला आहे. मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांना याची खंत नाही. त्यामुळे जीवंतच राहायचे नाही असे त्यांनी ठरविले आहे. ते २६ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहेत. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शासकीय धोरणामुळे दिव्यांग शेतकऱ्याला विनाकारण त्रास होवून मरण यातना भोगाव्या लागत आहे.

दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांची शेती १८ वर्षापूर्वी तलाठी मंडळ अधिकारी तहसीलदार व काही गावातील प्रतिष्ठांनी संगणमत करून कागदोपत्री चोरली. या सर्वांचे पुरावे असूनही न्याय न मिळाल्याने निवेदन ,आंदोलन , उपोषण दरवर्षी दरदिवशी दिव्यांग शेतकरी लढा देत आहेत. गेल्या वर्षीही दिवाळीला त्यांनी पोस्टरव्दारे त्यांनी 'आमची सहनशिलता संपली, उखाळ्या, पाखाळ्या, कुरघोड्या बंद करा, शेतकऱ्यांना भिक नको कुत्रे आवरा, रक्षकच झाले भक्षक, जिल्हयातील भ्रष्टाचारी प्रशासनाचा नंगानाच बंद करा' अशी वाक्ये लिहून पोस्टर प्रदर्शनातून आंदोलन केले होते. यासोबतच 'न्याय देता का कधी भेटु?' असा सवालही या पोस्टरव्दारे बाबुराव वानखडे प्रशासनाला विचारला होता.




यासंदर्भात त्यांनी याआधी वेळोवेळी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, रिसोड तालुक्यातील ग्राम अंचळ येथे ५४/२ हा गट क्रमांक अस्तित्वातच नाही. मात्र शासकीय रेकॉर्डमध्ये अस्तित्वातच नसलेल्या गट क्रमांकाची तहसिल प्रशासन आणि पटवारी ससाने, ज्ञानेश्वर पवार, आर. आर. बोरकर यासह सर्वसंबंधीतांनी संगनमताने निर्मिती करुन त्याव्दारे शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणातील मौजे अंचळ येथील मुख्य सुत्रधाराला अटक करण्यात यावी. तसेच आपण शासकीय कागदपत्रानुसार गट क्रमांक दाखविणाऱ्यास १० लाख रुपयाचे रोख बक्षीस देवू अशी घोषणाहर दिव्यांग शेतकरी बाबुराव वानखेडे यांनी केली आहे.

या प्रकरणी माझी जमीन मला परत मिळण्यासाठी मी गेल्या बारा वर्षापासून तहसिलदार, जिल्हा भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पालकमंत्री, खासदार, आमदार, मुख्यमंत्री आदींना असंख्य वेळा निवेदने दिली आहेत. मात्र माझ्या निवेदनाला प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कचऱ्याची टोपली दाखविली व मला न्याय मिळाला नाही. यासदंर्भात केलेल्या उपोषणात केवळ कोरडी आश्वासने देण्यात आली. तरी सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन मुख्य सुत्रधारांना अटक करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग शेतकरी वानखेडे यांनी केली आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी व प्रशासनाने शासनाच्या लेखी असलेला बोगस ५४/२ हा गट नंबर दाखवून द्यावा. गट नंबर दाखवून देणाऱ्याला आपण ताबडतोब १० लाख रुपयाचे बक्षीस देवू असे आवाहन वानखेडे यांनी प्रशासनाला केले आहे. त्यामुळे आता २६ जानेवारी रोजी पुन्हा आत्मदहन करणार असल्याचा इशाराही त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# धरण नव्हे शेतकऱ्याचे मरण, अधिकाऱ्याचे चुकीचे धोरण !

## *धरण रद्दबाबतचा ठराव मंजूर *१५० शेतकऱ्यांनी केल्या स्वाक्षऱ्या

•सिटी न्युज ब्युरो @ कारंजा•

पिंप्री मोडक येथे होणारे धरणा रद्द करणे बाबत दिनांक २२ जानेवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे ठराव घेण्यात आला या ठरावावर १५० शेतकऱ्यांनी सह्या केल्या व बहुसंख्य गावकरी मंडळी उपस्थित होती. धरण रद्द करणे बाबतचे सर्व मुद्दे ग्रामसेवक यांनी वाचून दाखवले तेव्हा सर्व ग्रामस्थांनी व धरणग्रस्त शेतकऱ्यांनी आपले हात वर करून धरण रद्द करण्याच्या ठरवायला मंजुरी दिली. यावेळी ग्रामपंचायत सरपंच ,उपसरपंच व सदस्य उपस्थित होते. धरणग्रस्त कृती समितीने १९ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम, उपविभागीय कार्यालय ,लघु पाटबंधारे विभाग कारंजा ,लघु पाटबंधारे उपविभग मंगरूळपीर या कार्यालय धडक दिली होती.






यावेळी जिल्हाधिकारी,उपविभागीय अधिकारी कैलास देवरे यांना धरणग्रस्त कृती समितीने निवेदन सादर केले.त्यानुसार आमची जमीन जर धरणामध्ये गेली तर आम्हाला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय उरणार नाही.कारण संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाबाबत कोणतीही सत्य माहिती शेतकऱ्यांना दिली नाही.जमिनीचे स्पष्ट भाव सांगितले नाही.शेतजमीन मोजण्याच्या नोटीस तसेच शेतीमधील विहिरी,बागायती झाडे इत्यादी मोजण्याची माहिती सुध्दा दिली नाही.या सर्वांचा परस्पर सर्वे व मोजमाप संबंधित अधिकाऱ्याला हाताशी धरून केला आहे. पर्यावरणाचे सुद्धा मोठे नुकसान होणार आहे.तसेच तामसवाडी व इंगळखेड ही दोन गावे उजाड असून यांना सुध्दा पिण्याच्या पाण्याचा व सिंचनाचा लाभ होईल असे सांगून अधिकाऱ्यांनी दिशाभूल केली आहे.तसेच शेतकऱ्यांची संमती घेतली नाही.८० टक्के शेतकऱ्यांनी अजूनपर्यंत या प्रकल्पासाठी संमती दिलेली नाही. धरणाच्या भिंतीमध्ये ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत अशा शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांनी एक-एकटे बोलावून त्यांना जमिनीचे जास्त भावाचे प्रलोभन दाखवून व त्यांची दिशाभुल करुन त्यांच्याकडून संमती घेतली. ते सर्व शेतकरी आजरोजी धरणामध्ये जाणाऱ्या शेतीच्या तुटपुंज्या मोबदल्याची माहिती मिळताच प्रकल्पाच्या विरोधात गेले आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना अंधारात ठेवून हा प्रकल्प करण्याचा अट्टाहास केला.या धरणामध्ये आमची जमीन गेली तर ८० टक्के शेतकरी भुमिहीन होईल.पिंप्री मोडक येथे होणाऱ्या धरणाच्या मागे २ कि.मी.अंतरावर हिवरा लाहे येथील धरण आहे.पिंप्री मोडक येथील प्रकल्पात जाणारी शेती हिवरा लाहे धरणाच्या ओलिताखाली येते. या धरणाची भिंत गावाच्या ४०० मीटर अंतरावरुन जात असल्यामुळे गावाला धोका आहे.पिंप्री मोडक येथे परिसरामध्ये पाण्याची मुबलकता आहे.सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई नाही. जमिनीचा मोबदला हा मिळालेल्या माहितीनुसार अतिशय अल्पदरात मिळत असल्यामुळे या मिळालेल्या जमिनीच्या मोबदल्यात आम्ही इतर कोठेही जमीन घेऊ शकत नाही.त्यामुळे आम्हा शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येईल. त्यात मुलाबाळांचे शिक्षण व पालनपोषण कसे करायचे. तसेच उद्या आम्हाला गाव सुध्दा सोडावे लागणार त्यामुळे बेरोजगारी वाढणार असा भयावह प्रश्न निर्माण झाला आहे.यामुळे आम्हाला शेवटी सामुहिक आत्महत्या केल्याशिवाय दुसरा पर्याय उरणार नाही याची आपण दखल घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.धरणग्रस्त कृती समिती अध्यक्ष किरण क्षार व सचिव संदीप इचे यांनी हा लढा धरण रद्द होईपर्यंत सुरूच राहील असे सांगितले.

## ग्रामपंचायतींच्या निवडणूका जाहीर करा-सुभाष देव्हढे

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका तात्काळ जाहीर करण्यात याव्यात, अशी ठोस मागणी माजी पंचायत समिती सदस्य सुभाष उत्तमराव देव्हाडे पाटील यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

वाशिम जिल्ह्यात सध्या सुमारे ५० ते ६० ग्रामपंचायतींची निवडणूक मुदत संपून दोन महिन्यांहून अधिक कालावधी लोटला आहे. या कालावधीत ग्रामपंचायतींचे कामकाज प्रशासकांमार्फत सुरू असून, त्यामुळे ग्रामीण भागातील विकासकामांवर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकास योजनांचा निधी ग्रामपंचायतीमार्फत खर्च केला जातो. मात्र, निवडणुका वेळेत न झाल्यास प्रशासकीय कारभारामुळे जनतेच्या कामांवर




मर्यादा येत असून लोकशाही व्यवस्थेचा गाभा कमजोर होत आहे, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे.निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, वेळीच निवडणुका न झाल्यास ग्रामीण जनतेमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता आहे, तसेच लोकप्रतिनिधी नसल्याने विकासकामांवर थेट परिणाम होत आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तातडीने ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्यात याव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाची प्रत राज्य निवडणूक आयोग (ग्रामपंचायत), मंत्रालय मुंबई तसेच संबंधित माध्यम प्रतिनिधींनाही देण्यात आली आहे. प्रशासन यावर कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अकबर प्लॉटमध्ये दोन मुलांवर वानराचा हल्ला

**अकोट:** शहरातील अकबर प्लॉटमध्ये दोन लहान मुलांवर वानरांनी हल्ला केला. त्यात ते किरकोळ जखमी झाले. जखमी मुलांवर रुग्णालयात उपचार करण्यात आले. माकडांच्या हल्ल्यामुळे परिसरात भितीचे वातावरण आहे. या भागात काही दिवसांपासून वानर तसेच मोकाट कुत्र्यांनी धुमाकूळ घातला आहे. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिका प्रशासन तसेच वन विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.



# सत्तेच्या सारीपटावर लागोपाठ चाली

♦ मनपा राजकारणात शुक्रवार ठरला महत्वाचा

प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला :** अकोला महापालिकेत सत्ता स्थापन करण्याबाबत शुक्रवारी मोठ्या प्रमाणात खेळी खेळली गेली. गुरूवार आणि शुक्रवारी सकाळी भारतीय जनता पक्ष विरोधी गट सक्रिय होता. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, आमदार साजीद खान पठाण यांनी मनपात सत्ता स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला होता. परंतु संध्याकाळी चित्र बदलले. आमदार रणधीर सावरकर यांनी शहर सुधार आघाडी सत्ता स्थापन करणार असा दावा केला.

अकोला महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी ४१ सदस्यांची आवश्यकता आहे. भारतीय जनता पक्षाचे ३८, राष्ट्रवादी अजित पवार, राष्ट्रवादी शरद पवार, शिंदे गट आणि अपक्ष मिळून ही संख्या ४४ होते. त्यामुळे सत्ता स्थापन करण्यात अडचण नाही.

विरोधी गटाकडून ज्या हालचाली सुरू होत्या. त्याविषयी माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आमदार रणधीर सावरकर म्हणाले, कुठल्याही परिस्थितीत महापौर भाजप मित्र पक्षांचाच होणार. तसेच विरोधक प्रयत्न करतीलच. बैठकी, डिनर डिप्लोमसी केली नाही तर आहेत ते सदस्य गमावण्याची भीती राहते असे सांगितले. सत्ता स्थापन करण्याबाबत ठाम विश्वास त्यांच्या बोलण्यातून दिसला. ३० रोजी महापौर, उपमहापौर निवड प्रक्रिया होणार आहे. त्यावेळी अकोला शहराला नववा महापौर मिळालेला असेल.



# जिल्हा परिषद आरक्षण 58 टक्के

♦ जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २४ जानेवारी



**अकोला :** अकोला जिल्हा परिषदेची आरक्षण मर्यादा ५८ टक्क्यांपर्यंत गेल्याने खळबळ उडाली आहे. संविधानाने निश्चित केलेल्या ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन करून हा निर्णय घेण्यात आल्याचा गंभीर आरोप केंद्रीय मानव अधिकार सुरक्षा संघटनेचे संदेश गोपनारायण यांनी केला आहे. संबंधित दोषी प्रशासकीय अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

यासंदर्भात विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. आरक्षणाबाबत सामाजिक, कायदेशीर अथवा वस्तुनिष्ठ अभ्यास न करता ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून ५८ टक्के नेण्यात आली. हा प्रकार प्रशासकीय बेजबाबदारपणा असून, कर्तव्यातील कसूर असल्याचा आरोप करण्यात आला.

या चुकीच्या निर्णयामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांचा लोकशाही पद्धतीने निवडणूक लढविण्याचा व निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याचा मूलभूत अधिकार हिरावून घेतल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यामुळे हा विषय केवळ आरक्षणापुरता मर्यादित नसून, तो थेट नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांशी संबंधित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, दफ्तर दिरंगाई, कायदा व शासन निर्णयांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यावर तत्काळ शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच या प्रकरणातील कार्यवाहीचा सविस्तर अहवाल तक्रारदारास देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# बाळापूर मतदारसंघातील साडेतीन हजार घरकुलांचा प्रश्न सोडवा

♦ आमदार नितीन देशमुख यांनी नियोजन व विकास समिती बैठकीत वाचा फोडली

प्रतिनिधी २४ जानेवारी




**अकोला :** बाळापूर मतदारसंघातील तीन साडेतीन हजार नियमानुकूल घरकुलांचा मुद्दा उपस्थित केला. जिल्हाधिकारी यांचे लक्ष वेधले. पातूर मध्ये हद्दवाढ निधीचा ज्वलंत विषय आहे. या संदर्भात अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देतात. कंत्राटदाराला पैसे दिले नाही म्हणून तो न्यायालयात गेला. उद्या न्यायालयाने आदेश दिले तर अधिकाऱ्यांच्या पगारातून पैसे देणार का याविषयी चर्चा झाली.

नगरपालिकांनी विकास आराखड्याचे प्रस्ताव सादर केले नाही या अत्यंत महत्त्वाच्या विषयाला आमदार नितीन देशमुख यांनी वाचा फोडली. तसेच अकोला शहरातील बंद पडलेला अंडरपास सुरू करा अशी मागणी केली. अंडरपास बंद का आहे कोणी सांगत नाही.

नाही तर तिथे धान्याचे गोदाम तरी करा. कारण सध्या गांजा पिणा-या लोकांसाठी ती जागा झाली आहे असे आमदार नितीन देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये 25 व 26 जानेवारी रोजी विशेष कँपचे आयोजन

प्रतिनिधी २४ जानेवारी





**अकोला :** आजच्या गतिमान युगात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या व्याधीने त्रस्त आहे. महागडी औषधे घेऊनही अनेक रुग्णांना आराम मिळत नाही. स्नायू, सांधे, गुडघे, कंबरदुखी इत्यादी त्रासाने त्रस्त असलेल्या रुग्णांना तात्काळ आराम मिळवून देण्यासाठी, शहरातील 'कमाल वेदना निवारण केंद्र' मध्ये २५ आणि २६ जानेवारी रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

नॅचरोपॅथी, ॲक्युथेरपी आणि कायरोप्रॅक्टिक उपचार पद्धतीनंतर कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये फक्त पंधरा ते वीस मिनिटांत वेदनेतून आराम मिळतो, असा दावा आग्रा येथील सुप्रसिद्ध बी.ई.एम.एस. नेचरोपॅथी व कायरोप्रॅक्टिक तज्ज्ञ डॉक्टर तरुण यादव आणि थेरपिस्ट डॉ. उदेन खान यांनी केला आहे.ष्गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, मणक्याच्या हाडामध्ये गॅपमुळे होणारी वेदना, हात-पायांना मुंग्या येणे, पायात पेटके येणे, मायग्रेनचा त्रास, छातीत दुखणे, पायांची जळजळ, अंगदुखी, मणक्याच्या हाडात गॅप, हात उचलता न येणे, हातामध्ये पेटके येणे किंवा शरीरात कोठेही वेदना असल्यास, या सर्व जुन्या दुखण्यांपासून मुक्ती मिळते. डॉ. तरुण यादव यांच्या मदतीने येथे एक ते दहा वर्षांपर्यंतच्या जुन्या वेदनेपासून केवळ १५ ते २० मिनिटांत पूर्णपणे आराम मिळू शकतो. आतापर्यंत डॉ. तरुण यादव यांनी शेकडो रुग्णांवर उपचार करून त्यांना रोगमुक्त केले आहे.

**कोणत्याही व्याधीपासून काही मिनिटांत मिळवा सुटका**

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक मोठे राजकारणी, उद्योगपती आणि सामाजिक संघटनांनी त्यांचा सत्कार केला आहे. २५ आणि २६ जानेवारी रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन रुग्णांना करण्यात आले आहे. महिलांसाठी येथे स्वतंत्र व्यवस्था आहे आणि ऑनलाईन नोंदणीची सोय देखील उपलब्ध आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कमाल वेदना मुक्त केंद्र मंगरूळपीर रोड युसुफ अली खदान गणेश शटरच्या बाजूला तसेच कृपया खालील मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा: मोबाईल क्रमांक: ८६२३८८८४४३ तसेच ९०४९८३१५७३.

# पथविक्रेत्यांना मिळणार आता क्रेडीट कार्ड



प्रतिनिधी २४ जानेवारी

**मूर्तिजापूर :** २३ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात क्रेडिट कार्डाचे वितरण शुभारंभ अनुषंगाने नगर परिषदेत क्रेडिट कार्ड व कर्जाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित पथविक्रेत्यांना क्रेडिट कार्ड वितरीत करण्यात आले.

मुख्याधिकारी निलेश जाधव यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन न.पा. सभागृहात करण्यात आले होते. नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपाध्यक्ष रोहित अव्वलवार यांच्या हस्ते २५ लाभार्थ्यांना दुसरा व तिसरा टप्पा २५ व ५० हजाराचे वितरण करण्यात आले. स्टेट बँक ऑफ इंडियचे व्यवस्थापक प्रशांत माने यांच्या हस्ते योगेश वानखडे या पथविक्रेत्याला क्रेडिट कार्ड मंजुरी पत्र वितरित करण्यात आले. यावेळी महिला व बालकल्याण सभापती सोनल काळबांडे, नगरसेवक गजानन नाकट, भूपेंद्र पिंपळे, लखन मिलांदे, राम जोशी, बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक अजय गिऱ्हे, सेंट्रल बँक ऑफ इंडिया च्या फील्ड ऑफिसर योगिता वानखडे , पथविक्रेता समितीचे सदस्य डिगांबर सदार, गंगा खाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. योजनेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजेश भुगुल यांनी आता पर्यंत ८५९ पथविक्रेत्यांना रु. २ कोटी १४ लक्ष इतके कर्ज स्वनिधी योजने अंतर्गत राष्ट्रीयीकृत बँका मार्फत वितरित करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच सदर योजनेतील लाभार्थींना विविध आठ योजनेत त्याचे सामाजिक आर्थिक सर्वेक्षणाचे आधारे लाभ देण्यात येत असल्याचे सांगितले, तसेच द्वितीय कर्ज पूर्णपणे परतफेड केलेल्या लाभार्थींना रु. ३० हजार लिमिट असलेले क्रेडिट कार्ड देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सदर क्रेडिट कार्ड मिळविण्याकरिता लाभार्थींना ऑनलाईन पोर्टल वर बँक कडे अर्ज सादर करा लागेल. तसेच प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजने अंतर्गत विशेष नोंदणी मोहीम राबविण्यात येत असून या मध्ये १५ फेब्रुवारी पर्यंत पी. एम .एस .वाय .एम. व एनपीएस ट्रेडर्स योजने अंतर्गत असंघटित क्षेत्रातील कामगार, फेरीवाले, छोटे व्यापारी, मजूर, घरगुती कामगार इत्यादी यांनी सदर योजनेची नोंदणी करून पेन्शन प्लॅनचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी योजनेचा शहरातील जास्तीत जास्त फेरीवाला व पथ विक्रेता यांनी पहिला टप्पा १५ हजार, दुसरा टप्पा २५ हजार व तिसरा टप्पा ५० हजार ची परतफेड करून लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परेश बुरघाटे सिस्टीम सपोर्ट अभियंता, शहर स्तर संघाच्या अध्यक्षा दुर्गा मोहिते, रुबीना परवीन समुदाय संघटिका, विलास ठाकरे, अमोल तायडे, नितीन शिंगणे यांनी सहकार्य केले.

# कस्तुरबा गांधी रूग्णालयात 100 बेडची व्यवस्था करा – आमदार साजीद खान पठाण

प्रतिनिधी २४ जानेवारी



**अकोला :** जिल्हा स्त्री रूग्णालयात प्रसूती साठी अकोला जिल्हा तसेच नजीकच्या भागातून महिला दाखल होतात. या रूग्णालयावरील अतिरिक्त भार कमी करण्यासाठी डुबकी रोडवरील कस्तुरबा गांधी रूग्णालयात १०० बेडची व्यवस्था करा. प्रसूती कक्ष स्थापन करा जेणेकरून जुन्या शहरातील महिलांची सोय होईल हा मुख्य विषय आपण जिल्हा नियोजन व विकास समितीच्या आजच्या बैठकीत लावून धरला असे आमदार साजीद खान पठाण यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

कस्तुरबा गांधी रूग्णालयाची मागणी जुनीच आहे पण विचार होत नाही अशी खंत आमदार पठाण यांनी व्यक्त केली. तसेच शहरातील रस्त्यांची कामे झाली पाहिजे आदी विकासात्मक मुद्यावर भर दिला. तसेच पालकमंत्री भाऊसाहेब फुंडकर यांचे चिरंजीव असल्याने त्यांच्या कडून अपेक्षा आहेत. ते चांगले आहेत परंतु त्यांच्या कामात कोण आडकाठी आणते कळत नाही असे आमदार साजीद खान पठाण म्हणाले. नियोजन व विकास समितीच्या बैठकीत माध्यमांच्या प्रतिनिधींना बसू द्या अशी आपली मागणी आहे. जेणेकरून लोकप्रतिनिधी कसे काम करतात तसेच सत्ता पक्ष कशाप्रकारे त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतो हेही जनते समोर येईल असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# मुख्य बस स्थानकातील हिरकणी कक्ष बंद

♦ स्थानकातील व्यवस्था त्रासदायक

प्रतिनिधी २४ जानेवारी







**अकोला :** अकोल्यातील मुख्य बस स्थानकात येणाऱ्या महिला प्रवाशांच्या सोयीसाठी दोन हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले. परंतु कक्ष बंद असल्याने त्याचा काहीही उपयोग होत नाही. मातांना बाळाला दूध पाजण्यासाठी स्वतंत्र कक्ष असावा हा उद्देश अयशस्वी झालेला दिसतो.

हिरकणी कक्षाला कुलूप आहे. आणि त्याचा वापर करण्यासाठी आगार व्यवस्थापकांकडून किल्ली घ्यावी लागते. आणि काम झाल्यावर किल्ली परत करावी लागते. घाईच्या वेळी हा द्राविडी प्रणाम अशक्य ठरतो. हिरकणी कक्षाची स्थापना नियोजन विकास समितीच्या ३ टक्के निधीतून करण्यात आली आहे. परंतु कक्ष स्थापन करण्या मागील उद्देश, त्यावर झालेला अनाठायी खर्च याचे काय असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

# प्रजासत्ताक दिनासाठी राष्ट्रध्वजाची मागणी





प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला :** भारतीय प्रजासत्ताकाचा ७७ वा वर्धापनदिन सोमवार, २६ जानेवारी रोजी साजरा करण्यात येत आहे. शहरात राष्ट्रध्वज, तिरंगी पताका तसेच अन्य साहित्य दृष्टीस पडत आहे. नवीन ध्वज खरेदीसाठी दुकानात ग्राहकांची गर्दी दिसते.

विविध प्रतिष्ठाने, कार्यालयावर ध्वजारोहण करण्यात येते. त्यामुळे नवीन ध्वज खरेदी केला जातो. तर त्यांच्याकडे चांगल्या प्रतीचे राष्ट्रध्वज आहेत, ते इस्त्री करून ठेवतात. राष्ट्रध्वज संहितेचे पालन करणे आवश्यक आहे. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखला जावा ही सर्वांची जबाबदारी आहे. जिल्हा प्रशासनाकडून या संदर्भात आवाहन करण्यात येते.

# स्कूल ऑफ स्कॉलर्स येथे 'पैठणी विद्वत्तेची' हळदी – कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा

प्रतिनिधी २४ जानेवारी

**अकोला :** स्कूल ऑफ स्कॉलर्सचे संस्थापक व मालक पं. शंकरप्रसादजी अग्निहोत्री यांच्या वाढदिवसानिमित्त 'पैठणी विद्वत्तेची' या संकल्पनेवर आधारित हळदी-कुंकू कार्यक्रम मोठ्या उत्साहात व पारंपरिक वातावरणात पार पडला. महिलांचा सन्मान, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून आयपीएस अधिकारी ईशानी आनंद उपस्थित होत्या. त्यांनी महिला सक्षमीकरण, शिस्त आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. स्कूल ऑफ स्कॉलर्सने महिलांसाठी राबवलेल्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. विशेष अतिथी म्हणून पल्लवी केदारे यांनी महिलांना सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. स्कूल ऑफ स्कॉलर्सतर्फे नगरसेविका योगिता पावसाळे, नगरसेवक धनंजय धबाले, नगरसेवक सोनोने आणि





नगरसेविका पूजा गावंडे यांचा सत्कार करण्यात आला. शहराच्या विकासासाठी व समाजसेवेसाठी त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले. पल्लवी डोंगरे यांनी सूत्रसंचालनातून महिलांना विविध मनोरंजक खेळांमध्ये सहभागी करून घेत कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. खेळांच्या विजेत्यांना स्कूल ऑफ स्कॉलर्सतर्फे आकर्षक पैठणी साड्यांचे बक्षीस देण्यात आले, ज्यामुळे महिलांमध्ये आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमास शाळेच्या वतीने प्राचार्या सौ. मनीषा उंबरकर आणि प्रशासकीय अधिकारी ॲड. सुमीत बोकाडे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी सर्व मान्यवर पाहुणे, नगरसेवक, शिक्षकवृंद, कर्मचारी व उपस्थित महिलांचे आभार मानले तसेच शाळेचा सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोन अधोरेखित केला. 'विद्वातीची पैठणी' या संकल्पनेमुळे कार्यक्रमाला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा विशेष साज चढला. हळदी-कुंकू कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत एकात्मता, सन्मान आणि स्त्रीशक्तीचा उत्सव साजरा केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK